वेदांत व गायन.

किमत ६ आणे.

दांत व गायन

संपादक व प्रकाशक

स. वा. परांजपे-मुंबई.

मुद्रक.

द. गो. सडेकर-खानापूर

" धनंजय " प्रेसचे मालक.

सन १९११ इसवी

आवृत्ति १ ली,

प्रती १०००

किंमत ८६ आणे

प्रस्तावना.

कोल्हापुरचे प्रसिद्ध समाधिस्थ श्रीकृष्णस्वामी ह्यांना गुरु मानल्यापासून वेदांतविषयावर प्रेम जडलें. गायनाचा नाद असल्यामुळें आमचे स्नेही रा॰ रा॰ काशिनाथपंत लघाटे ह्यांनीं गायनाची माहिती निरपेक्ष बुद्धीनें दिली. गायनाबरोबर वेदांतावरही आमचा नेहमीं वादविवाद होत असे त्यामुळें आमचें मन गायनाचे आलाप व वेदांताचे विचार ह्या दोहोंमध्यें सारखेंच रमूं लागलें शेवटीं दोन्हीं विषयांमध्यें बरेंच साम्य आहे असें वाटल्यामुळें हें पुस्तक लिहिण्याचें हातीं घेतलें. हें पुस्तक तपासण्याचे कामीं रा॰ रा॰ काशिनाथपंत लघाटे व श्रीयुत विष्णु बळवंत थोरात ह्या उभयमित्रांनी फार मदत केली आहे. वेदांतासारखा गहन व गायनासारखा रम्य विषय हातीं घेऊन त्याची तुलना योग्य रीतीनें करणें कठीण काम आहे; परंतु दोहोंमधील साम्याचे विचार साधारण वाचकांना कळल्यास गायनाप्रमाणें वेदांताकडेही त्यांचें लक्ष जाईल व त्यापासून त्यांना आनंद व बोध होईल असा भरंवसा वाटल्यामुळें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. हें सर्व वाचून मग आपण ह्या संबंधीं आपला अभिप्राय ठरवावा अशी नम्र विनंति आहे. प्रस्तावनेची नांदी जास्त न वाढवितां मुख्य विषयाकडे आपलें लक्ष लवकर लागण्यासाठीं आपली रजा घेतों.

आपला नम्र सेवक,

स. वा. परांजपे.

अनुक्रमणिका.

वेदांत व गायन.

परब्रम्ह व नादब्रम्ह.

हें जग पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ह्या पांच पदार्थांचें बनलें आहे ह्या पांच पदार्थांपैकीं एकाचें जर आस्तित्व नाहींसें झालें तर सर्व जग नष्ट होईल. हीं पांच द्रव्यें म्हणजे जगाचे पंचप्राण होत. जगाची उत्पत्ति, स्थिती व लय करणें हें एका शक्तीचे हातीं आहे.

जगचालनाचीं सर्व सूत्रें ह्या शक्तीनें आपले स्वाधीन ठेविलीं आहेत. जगांतील सर्व कृत्यें नियमीतरीतीनें चालावीं अशी हिनें व्यवस्था करून ठेविली आहे घड्याळास एकदां किल्ली देवून ठेविली म्हणजे तें जसें नियमीत कालपर्यंत वेळ दाखविण्याचें काम करतें त्याप्रमाणें ह्या शक्तीनें जग निर्माणाचे वेळीं किल्ली देवून ठविली आहे व त्याप्रमाणें जगांतील सर्व कृत्यें हिचे इच्छेप्रमाणें चालतीं आहेत.

घड्याळास किल्ली देवूनही आकस्मिक धक्यामुळें, पडल्यामुळें, केर अडकल्यामुळें अगर चक्रांत बिघाड झाल्यामुळें, घड्याळ बंद पडण्याचा संभव आहे. परंतु हें जगाचें घड्याळ मध्यंतरीं कधींच बंद पडावयाचें नाहीं.

जगांतील सर्व कृत्यें नियमीत कालपर्यंत चालून जगाच्या लयाच्यावेळीं पंचमहाभूतांपैकीं एकाचें प्राबल्य जास्त वाढून जग नष्ट होईल. अशा वेळास प्रलयकाल असें म्हणतात. ही मनुष्याची कल्पना आहे तरी पण ज्याला जग उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे, त्याला तें नष्ट करण्याचें सामर्थ्य नाहीं असें म्हणणें गैर आहे. यास्तव तें नष्ट होण्यासाठीं पंचमहाभूतांपैकीं एकाचें प्राबल्य होणें निर्विवाद आहे.

मनुष्यदेहाचे किंवा कोणत्याही सचेतन प्राण्याचें, मरणाचे म्हणजे लयाचे-वेळीं कफ, वात किंवा पित्त ह्यांपैकीं एकाचें प्राबल्य होतें. त्यामुळें शरिरां-तील उष्णता प्रथम वाढून एकदम नाहींशी होते व वायुरूप प्राणही

नाहींसा होऊन देह अचेतन होतो हेंच मरण होय. जगप्रलयाचे वेळीं पृथ्वी दुभंग होऊन सर्वत्र पाणी होईल किंवा वायु (हवा) नाहींसा झाल्यामुळें गुदमरून सर्व प्राणी नष्ट होतील अथवा तेजापासून अग्नि उत्पन्न होऊन सर्व जग जळून जाईल. नाहींतर आकाश नाहींसें झाल्यामुळें आकर्षणशक्ती नाहींशी होऊन सर्व जग नाहींसें होईल. ह्याखेरीज दुसऱ्या अन्यप्रकारानेंही जग नाहींसे होणार नाहीं असें नाहीं.

जग नाहींसें झाल्यावर जें अवशिष्ट राहील तेंच शक्तीचें स्वरूप होय. परंतु तें आपल्या देहाचे अस्तित्वानंतर सर्वत्र भरून राहणार असल्यामुळें त्याचें " पूर्ण रूप " आपणांस चर्मचक्षूनें दिसणें शक्य नाहीं. कारण तें पूर्णरूप बनण्याकरितां आपल्या आत्म्याचाही त्याचे ठिकाणीं लय झाला पाहिजे.

ह्या जगामध्यें जे पदार्थ दिसतात त्याचे मुख्य दोन भाग आहेत. पहिला भाग अचेतन पदार्थांचा; ह्यास जड किंवा निर्जीव पदार्थ अशी संज्ञा आहे. दुसरा भाग चेतन पदार्थांचा आहे. त्यांस सजीव अशी संज्ञा आहे ह्या सजीव पदार्थांचे दोन वर्ग आहेत. पहिला वर्ग प्राण्यांचा व दुसरा वर्ग वनस्पतींचा होय.

अचेतन पदार्थांमध्यें सोनें, रुपें, कथील, शिसें, तांबें, लोखंड वगैरे धातु व माती, गंधक, चुना वगैरे जड पदार्थ येतात.

चेतन पदार्थांमध्यें—पशू, पक्षी, कीडमुंगी वगैरे प्राणी व मनुष्यप्राणी हे पहिल्या वर्गामध्यें व वनस्पती दुसऱ्या वर्गामध्यें येतात.

अचेतन पदार्थांमध्यें एकप्रकारची शक्ती आहे परंतु ती सजीव प्राण्यांची बरोबरी करण्यासारखी नाहीं. ह्या पदार्थांमध्यें चैतन्य नाहीं. ह्यामुळें सृष्टीमधील पदार्थ शोषण करून स्वतःची वाढ होण्याची ताकद ह्यामध्यें नाहीं. ह्याच्यावर हवा, पाणी वगैरेचा परिणाम होऊन त्यांचे मूळ स्वरूपांत बदल होतो. परंतु कृतीनें त्यांवर झालेला परिणाम नाहींसा करून त्याला मूळस्वरूप देतां येतें. ह्या पदार्थांनां मरण नाहीं. ह्यांचीं रूपांतरें जरी अनेक झालीं तरीं ज्याअर्थीं त्यांनां पूर्वरूप कृतीनें देतां येतें, त्याअर्थीं त्यांचा लय होत नाहीं. सृष्टी निर्माण करतेवेळीं हे पदार्थ जितके निर्माण झाले तितके ते अनेक रूपांत कायम आहेत.

चेतन पदार्थांपैकीं दुसऱ्या वर्गांतील वनस्पती, ह्या आपले पोषणाचे पदार्थ हवेंतून व जमीनींतून शोषून घेतात. हवेपेक्षा जमीनीमधील द्रव्याची ह्यांना जास्त जरूर असल्यामुळें जमीनीशिवाय ह्या वाढत नाहींत. जमीन हें वनस्पतीचें हृदय होय. हृदयाखेरीज प्राणी ज्याप्रमाणें जगत नाहींत त्याप्रमाणें जमीनीशिवाय वनस्पतीचें जीवन अशक्य होय. अंतराळीं कुंडीमध्यें वनस्पती वाढतात; पण त्यांचेखालीं माती (जमीन) असावी लागतेच. भांड्यामध्यें वनस्पतीचें बीज भिजवून ठेविल्यास त्या बीजास मोड येतील व कांहीं पानेंही येतील; परंतु मोड पोसण्यापूर्वीं मरण पावतात. वनस्पतींचे वाढीस जमीन अवश्य असल्यामुळें त्या स्थीर असतात, म्हणजे त्यांची वाढ व उत्पत्ति एका ठिकाणीं होते; म्हणून जमीनीप्रमाणें वनस्पतीही जिवंत असेपर्यंत त्या स्थावर (अचल) मिळकतीमध्यें गणिल्या जातात. प्राण्याप्रमाणें वनस्पतींसही आयुष्य असतें म्हणजे त्या नियमित काळपर्यंत वाढून पुढें मरण पावतात.

चेतन पदार्थांपैकीं पहिला वर्ग म्हणजे मनुष्यें, जनावरें, पक्षी, कीटक व सूक्ष्म जंतु, ह्यांचा होय; ह्या सर्वांस प्राणी अशी संज्ञा आहे. ह्या सर्व प्राण्यामध्यें मनुष्यप्राणी हा पहिल्या प्रतीचा होय. ह्याला इतर प्राण्यांप्रमाणें पंचेंद्रियें म्हणजे श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा व घ्राण हीं आहेत. त्यांचेयोगानें त्याला शब्द, स्पर्श, रूप, रस, व गंध ह्यांचें ज्ञान होतें. परंतु इतर प्राण्यापेक्षां विशेष देणग्या परमेश्वरानें मनुष्यास ज्या दिल्या आहेत त्या “ वाचा ” व प्रबल विचारशक्ति ह्या होत. ह्या दोन देणग्या इतर प्राण्यांना नसल्यामुळें त्यांची मनुष्यप्राण्याबरोबर उत्पत्ति होऊनही, त्यांची उत्पत्तिकालाचे वेळीं जी स्थिति होती तीच आज कायम आहे. त्यांची उन्नति बिलकुल झालेली नाहीं. मनुष्यास वाचा व प्रबल विचारशक्ति दिली आहे; ह्यामुळें सृष्टपदार्थांचें ज्ञान मनुष्यानें शक्य तेवढें करून घेतलें आहे. विचारशक्तीचें कारण मेंदु आहे. इतर प्राण्यापेक्षां मनुष्याचे मेंदूचें वजन जास्त आहे. मनुष्याहून जास्त वजनाच्या मेंदूचे प्राणी दोन आहेत. त्यांपैकीं एक जलचर व दुसरा स्थलचर आहे. जलचर प्राणी देवमासा होय. त्याचे मेंदूचें वजन सुमारें पांच रत्तल आहे. स्थळचर प्राणी हत्ती होय. त्याचे मेंदूचें वजन सुमारें

दहा रत्तल आहे मनुष्याचे मेंदूचें वजन सुमारे तीन रत्तल आहे. मनुष्याहून हत्ती व देवमासा ह्यांचे मेंदूचें वजन जरी जास्त आहे तरी त्यांच्या शरीराच्या मानानें तें फार थोडेंच आहे शिवाय त्यांना वाचा व प्रबल विचारशक्ति नाहीं तरी हे दोन्हीं प्राणी इतर प्राण्यांपेक्षां (मनुष्याशिवाय) बुद्धीनें श्रेष्ठ आहेत. वनस्पती कांहीं नियमीत स्थितींतच जगूं शकतात; वनस्पतींस जमीनींतून उपटून काढल्यावर व माशास पाण्यांतून बाहेर काढल्यावर किंवा मनुष्यास पाण्यामध्यें बुडविल्यावर हे तिन्हीही मरण पावतात. सर्व चेतनप्राण्यामध्यें मनुष्यप्राणी श्रेष्ठ आहे. सृष्ट विषयांचें शक्य तेव्हडें ज्ञान करून घेण्याची खटपट मनुष्यानें सारखी चालविली आहे. ह्यामुळें जड पदार्थांत, चेतनपदार्थांमध्यें व पंचमहाभूतांमध्यें जे गुण परमेश्वरानें भरून ठेविले आहेत त्यांचा शक्य तेवढा शोध करून त्यांचा उपयोग मनुष्य करून घेत आहे. मनुष्याचे शोधक गुणामुळें तो निर्माण झाल्यापासून त्याची सारखी उन्नति होत चालली आहे. सृष्ट पदार्थांचे निरनिराळे गुण मनुष्य शोधून काढीत आहे. त्याचा उपयोग तो स्वतःचें सुख वाढविण्याकडे करीत आहे. ह्यापुढेंही मनुष्यप्राणी आपलें गुणशोधनाचें कार्य अव्याहत चालू ठेवील व त्याचीं कोणतीं फलें त्याला मिळतील ह्याचा अंदाज करतां येत नाहीं.

कारण मनुष्यानें आजपर्यंत कितीतरी शोध लाविले आहेत. ग्रहमालेचें सूक्ष्म निरीक्षण करून ग्रहांच्या गती शोधून काढल्या व सर्व जगाचें कालमापन एक करून टाकिलें वाफेच्या गुणधर्मांचें ज्ञान करून घेऊन आगगाड्या व मोठमोठीं वाफेचीं यंत्रें शोधून काढलीं रेशमामध्यें विद्युतशक्ति आहे हें लक्षांत आल्याबरोबर त्यावरून अनेक शोध लावून तारायंत्रें व इतर यंत्रें चालू केलीं. हवेपेक्षां हलका असा हायड्रोजन वायु सांपडल्याबरोबर विमानाची कल्पना उत्पन्न होऊन आज तरी ती इतक्या स्थितीला पोंचली आहे कीं. आगबोटी, आगगाड्या व विजेच्या गाड्या वगैरे बंद पडणार किंवा काय असें वाटूं लागलें आहे. बिन धुराची दारु व बिनतारेचे तारायंत्र ह्यांचाही चांगला उपयोग होऊं लागला आहे. ह्यापुढें किती महत्वाचे शोध लागतील व त्यामुळें मनुष्याचे सुखांत किती भर पडेल ह्याची आज कल्पनाच करितां येत नाहीं.

मनुष्य कितीही कर्तृत्ववान् झाला तरी त्याला मरण चुकत नाहीं. मरणाची कल्पना मनुष्याचे मनांत उभी राहिली म्हणजे त्याला आपण क्षुद्र आहों असें वाटूं लागतें. मृत शरीर पाहून त्याचे जीवाविषयीं व आत्म्याविषयीं मनांत विचार उत्पन्न होतात. एवढ्या देहाला चलनवलन देणारी अनेक कृत्यें करणारी अशी शक्ती कोठें नाहींशी झाली ? राहिलेला देह तर मातीच्या मोलाचा झाला व त्यांत जीव होता तेव्हां तर त्याची किंमत अमूल्य होती. शरिरांतून आत्मा गेल्याबरोबर शरीर कुजूं लागतें. हें शरीर बर्फामधें किंवा त्याहून कमी उष्णतेमध्यें ठेविल्यास कुजल्याशिवाय जसेंच्या तसें राहूं शकतें. तेलांत किंवा दारुमध्येंही टिकूं शकतें. हवा बिलकूल आंत राहाणार नाहीं अगर आंत जाणार नाहीं अशा पेटीमध्यें ठेविलें तरी चांगलें राहतें. त्याचप्रमाणें ह्या शरीरामध्यें सोमल वगैरे विषें घातल्यासही तें जसेंच्यातसें असतें परंतु त्याची जी चलनशक्ति एकदां नष्ट झाली ती कांहीं केलें तरी परत येत नाहीं. गेलेला जीव परत येत नाहीं असें लक्षांत आल्यावर व आपलें जीवित क्षणभंगुर आहे हें मनास पटल्याबरोबर मनुष्य ह्यासंबंधीं विचार करूं लागतो

हें सर्व जग प्राण्यांनीं भरून गेलें आहे. ह्या सर्व प्राण्यामधें आपल्या सारखीच चलनशक्ती आहे; पण ती एकदां गेली म्हणजे पुन्हां परत येत नाहीं. पाणी, रक्त, किंवा रेत ह्यांचा एक थेंब घेऊन तो जर सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं ठेवून पाहिला तर त्यामध्यें हजारों जीव दिसूं लागतात. हे अनेक जीव पाहून असें वाटतें कीं, ह्या प्रत्येक थेंबामध्यें एक निराळें जगच सांठविलें आहे. हवेमध्येंही सूक्ष्म जंतु अनेक आहेत. एखाद्या बिन उजेडाचे खोलींत एखाद्या फटींतून सूर्यकिरणाचा कवडासा पडतो. ह्या कवडाशामधें अनेक प्राणी वर खालीं जातांनां दिसूं लागतात. दूध वगैरे पदार्थ प्रथम आंबतात. जास्त काल राहिल्यास त्यांत जंतु उत्पन्न होतात. ह्याचें कारण हे हवेंतील जंतु दुधांतील जंतूशीं मिसळून त्यापासून जंतूंचीं उत्पत्ति होते. पृथ्वीचा तीनचतुर्थांश भाग पाण्यानें व्यापलेला आहे तो सर्व जंतुमय आहे; पृथ्वीवर जें आकाश दिसतें त्याचे उंचीचा अद्याप अंतही लागलेला नाहीं. त्याचें वेष्टन पृथ्वीला आहे; ह्यामधें किती जंतु असतील त्याचा हिशेबाचा आंकडा मांडण्यास एका मनुष्याचें आयुष्यही अपुरें पडेल!

हें जग केव्हां उत्पन्न झालें व किती काल असेंच राहणार ह्याचा अंत मनुष्यास लागणें अशक्य आहे. मनुष्याचें आयुष्य फार थोडें आहे. कितीएक उपजण्यापूर्वींच (गर्भावस्थेंतच) मरतात, कित्येक उपजतांच प्राण सोडतात, कित्येकांना ऐन तारुण्यांत जग सोडावें लागतें. मनुष्याचें जास्तींतजास्त आयुष्य म्हटलें म्हणजे १०० वर्षें होय. हा शंभर वर्षांचा काल सृष्टीचे आयुष्यापुढें कांहींच नाहीं.

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, जड व चेतन पदार्थ हे पाहिले म्हणजे मनुष्याला अत्यंत आश्चर्य वाटतें. आपल्या हातून ह्यांपैकीं एक-सुद्धां पदार्थ निर्माण होणें अशक्य आहे, हा विचार दृढ होतो. मनुष्य कितीही हुषार झाला तरी त्याला एकही पदार्थ स्वतंत्रपणें तयार करतां येणें शक्य नाहीं. ह्याकामीं त्याला सर्वस्वीं सृष्टपदार्थांवरच अवलंबून राहावें लागतें. तेव्हां हे सृष्टपदार्थ तरी निर्माण कसे झाले ? हे निर्माण करणारी कोणी अजब शक्ति असावी असें वाटतें. हा विचार उत्पन्न झाला म्हणजे मनुष्याचे संसारीविचार सर्व मावळून त्याचें अंतःकरण स्थिर होतें. त्याची विचारशक्ति कुंठित होऊन कांही काल मति स्तब्ध होते. अशी सृष्टपदार्थ निर्माण करणारी शक्ति निराळी आहे, त्या शक्तीची अंशतःही बरोबरी आपल्या हातून होणार नाहीं अशी त्याची खात्री होते. मग पुढें विचाराचा समुद्र दिसूं लागतो. शेवटीं त्याचे मनाची पक्की खात्री होते कीं, मनुष्याहून अत्यंत उच्च दर्जाची शक्ति असल्याशिवाय हें जग अबाधित चाललेलें नाहीं. ह्या शक्तीसच परब्रम्ह किंवा परमेश्वर असें म्हणतात.

ही परमेश्वराची शक्ति सर्वत्र भरून राहिली आहे. ह्यामुळें परमेश्वर तरी कोणास म्हणावें असें वाटूं लागतें. मनाची एकाग्रता करून विचार करूं लागलें असतां आपल्या बुद्धीस असें वाटूं लागतें कीं, परमेश्वराचें मूर्तस्वरूप आपणांस दिसणें अशक्य आहे. नकाशावरील देश, शहर, पर्वत, नदी, रस्ता वगैरेच्या रेषा पाहून मनाचें जसें काल्पनीक समाधान होतें, त्याप्रमाणेंच परमेश्वराच्या मनुष्यकृत मूर्ति व तसबीरी पाहून त्याचे स्वरुपाची कल्पना करावी लागते. भूगोलाचें पुस्तक वाचून एखाद्या शहराची कल्पना जितकी मनांत उभी राहाते तितकीच परमेश्वराची

देवालयें पाहून त्याचे स्वरूपाचा अंदाज होतो. ह्याहून पुढची पायरी म्हणजे भूगोलांतील वर्णन वाचून, एखादें शहर प्रत्यक्ष पाहावयाचें; तें प्रत्यक्ष पाहिल्यावर भूगोलांतील वर्णनाचे कितीतरीपटीनें त्यासंबंधीं जास्त माहिती होते. त्याचा प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें मनाचें पूर्ण समाधान होतें त्याचप्रमाणें देवालयांतील मूर्तीमध्यें परमेश्वराची कल्पना भरलेली आहे. परंतु बाह्यसृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावर परमेश्वराची प्रत्यक्ष कृति दृष्टीस पडते. त्यामुळें त्याचे गुणाची तरी आपणास चांगली ओळख होते.

इतिहासामध्यें मोठमोठ्या प्रसिद्ध पुरुषांचीं जीं चरित्रें गोंविलीं आहेत. त्यांमध्यें त्यांचे चित्रापेक्षां त्यांचे हातून घडलेलीं कृत्येंच आपले मनास जास्त संतोष देतात त्या कृत्यांच्या बरोबर त्यांच्या देहांच्या प्रतिमेचें दर्शनही मनास उल्हास देईल परतु तो उल्हास उत्पन्न होण्याचें मुख्य कारण त्यांचीं कृत्येंच होत. आजपर्यंत जे इतिहासप्रसिद्ध पुरुष झाले आहत त्यांमध्यें एकादा मनुष्य, त्याचे अंगीं दुसरे कांहीं गुण नसतां फक्त तो सुंदर होता म्हणून त्याचें नांव आलेलें नाहीं. ह्याचें कारण उघड आहे कीं गुण विरहित सौंदर्य हें कांहीं एक उपयोगाचें नाहीं.

बुद्धि व विचारशक्ति ह्यांचें मुख्य कारण स्मरण होय; आणि ही स्मरणशक्ति तर मनुष्यप्राण्यांमध्यें फार कमी आहे. मूल निदान वर्षाचें होईपर्यंत त्याजमध्यें स्मरणशक्ति उत्पन्न होत नाहीं; व त्यानंतर जरी झाली तरी तें जसजसें मोठें होत जातें तसतसें त्याला मागील गोष्टींचें स्मरण रहात नाहीं. लहानपणीं म्हणजे पांच सहा वर्षांच्यावेळीं ज्या मुलाच्या नेहमीं संनिध असणारी आई मरण पावते त्यावेळीं कांहीं काळ त्याला तिचें स्मरण असतें. परंतु उत्तरोत्तर तें इतकें कमी होतें कीं, त्याला आईचें मुळींच स्मरण रहात नाहीं. मनुष्य म्हातारा झाल्यावर त्याची स्मरणशक्ति कमी होत जाते. मनुष्य ऐन तारुण्यांत असतांना म्हणजे २०-२५ वर्षांचे वयाचे सुमारास त्याची स्मरणशक्ति बरीच वाढते; तरी पण आजार, काळजी वगैरेमुळें तिचा पूर्ण विकास होत नाहीं. तेव्हां इतक्या कमी स्मरणशक्तीच्या जोरावर त्यानें सृष्टपदार्थांचें ज्ञान तरी कसें करून ध्यावें? सृष्टपदार्थांचें योग्य ज्ञानही आपणास होणें

अशक्य आहे. मग तें निर्माण करणारा—परमेश्वर त्यासंबंधीं तरी आपणास कितीसें ज्ञान मिळवितां येईल ?

प्राण्यांमध्यें जरी मनुष्य श्रेष्ठ आहे तरी कित्येक प्राण्यांमध्यें जे विलक्षण नैसर्गिक गुण आढळतात ते प्रयत्नानेंही आपणास साध्य होत नाहींत. बऱ्याच वर्षांपूर्वीं पाहिलेला अड्डा, बैल चट्दिशीं ओळखतात. गिधाड व घार वगैरे पक्षी उंच आकाशांतून जमीनीवरची कीड वगैरे पाहतात व त्यावर अचूक झडप घालतात. हत्ती टांचणीसारखा बारीक पदार्थ देखील आपल्या ओबडधोबड सोंडेनें लवकर उचलूं शकतो. मुंगी आपलें भक्ष अचुक शोधून काढते व आपले शरिराच्या मानानें पुष्कळ वजन उचलते किंवा ओढून नेते बऱ्याच अंतरावर असलेल्या सावजाचा वास शिकारी कुत्र्यांना येतो व ते त्याचा पाठलाग बिनचूक करितात. जनांवरांनां उत्तम पोहतां येतें. सर्पाच्या ध्यानांत शब्द चांगला राहतो ह्यावरून असें वाटतें कीं, जगांत क्षुद्र अशी वस्तु कोणतीच नाहीं. प्रत्येक वस्तूंत कांहींना कांहींतरी विशेष गुण आढळतो. ह्याच विशेष गुणास परमेश्वरी अंश असें कित्येक म्हणतात.

परमेश्वराचें रूप मनुष्यास दिसणें अशक्य आहे म्हणून सृष्टीमध्यें दिसणारे सर्व पदार्थ परमेश्वररूपच भासतात व हें भासणें खरें आहे. मुलामध्यें बापाचे गुण जसे दृष्टीस पडतात त्याच प्रमाणें सृष्टीमध्येंही परमेश्वराचे गुण दृष्टीस पडतात. गुण हें खरें रूप होय. मनुष्यास जो पदार्थ अलौकिक वाटला त्यास तो परमेश्वर समजूं लागला; व त्याची उपासनाही तो करूं लागला. कित्येक आपले आवडीप्रमाणें परमेश्वरास सगुणरूप देऊन त्याला भजतात. कित्येक ईश्वरनिर्मित वस्तूंस परमेश्वर समजून भजतात. कित्येकांनीं समुद्र, चंद्रसूर्यादि ग्रह, जमीन, वनस्पती, अग्नि, तेज, नद्या, जनावरें वगैरे पदार्थांस परमेश्वराचें रूप दिलेलें आहे त्याच प्रमाणें त्याचें स्तवन करतांना त्याचे निरनिराळे भक्तांनीं त्याला इतकीं नांवें दिलीं आहेत कीं, सृष्टपदार्थांचीं नांवें दर्शविणारा कोशही त्यांनां पुरला नाहीं म्हणून त्या शब्दांचे जोड शब्द त्यांनीं तयार केले. ह्यावरून असें दिसतें कीं, सर्वांचे मतें परमेश्वर सर्व ठिकाणीं ज्ञानरूपानें भरला

असून त्याचें सगुण (अथवा निर्गुण रूप धरिलें तरी तें रूपच आहे) रूप निराळें आहे.

हें परमेश्वराचें रूप जसें सर्वत्र भरलेलें आहे त्याच प्रमाणें हें सर्व जग " नादानें " सर्वत्र भरलेलें आहे. पदार्थास चलन मिळालें कीं, त्या ठिकाणीं नाद उत्पन्न झालाच पाहिजे. ह्या नादाचें स्वरूप आपणांस म्हणजे आपले कानास कळतें. परमेश्वराचे स्वरूपाविषयीं विचार करतांनां मन जसें तल्लीन होतें त्याच प्रमाणें " नाद " ऐकूनही आपलें मन गुंगतें. म्हणूनच मन एकाग्र होण्यासाठीं " नादा " चा उपयोग करतात. देवालयामध्यें घंटा, लग्नकार्यांत वाजंत्री, लढाईमध्ये वाद्यें, डोंबाऱ्याचे खेळामध्ये ढोलकें व कीर्तनामध्यें आणि गायनामध्यें अनेक वाद्यें वाजविण्याचा जो प्रघात पडला आहे त्याचें कारण तरी " नादा " मुळें मनाची एकाग्रता व्हावी हेंच होय परमेश्वराप्रमाणें नाद सर्वत्र भरलेला असून त्याचे योगानें मनाची एकाग्रता होते; म्हणून अशा नादासही अग्नि, सूर्यचंद्रादि ग्रहांप्रमाणें आम्हीं परमेश्वररूप मानूं लागलों परमेश्वराची शक्ति म्हणजे ब्रम्ह होय ! हें सर्वत्र भरलें असल्यामुळें, अन्नब्रम्ह, वायुब्रम्ह, स्थलब्रम्ह, जलब्रम्ह, तेजब्रम्ह वगैरे शब्दांनीं त्याचें वर्णन केलेलें आहे. त्याचप्रमाणें आम्हीं " नाद " ह्या शक्तीस " नादब्रम्ह " असें नांव दिलें आहे.

ह्या " नादब्रम्हा " मध्यें परब्रम्हाप्रमाणें बरेच गुण आहेत, ह्यामुळें नादास ब्रम्ह हें नांव चांगलें शोभतें

परब्रम्ह जसें सर्वत्र भरलेलें आहे, त्याप्रमाणें नादब्रम्हही सर्वत्र आहे परब्रम्हाचें स्वरूप जसें आपणांस दृष्टीस दिसत नाहीं त्याप्रमाणें नादब्रम्हही पहाणें अशक्य आहे. परब्रम्ह जसें त्रिकाल आहे तसें नादब्रम्हही सर्वकाल आहे. परब्रम्हाचा जसा अंत लागला नाहीं, तसा नादब्रम्हाचाही ठाव लागलेला नाहीं.

परमेश्वर सर्वत्रच भरून उरलेला आहे तर तो " नादा " मध्यें मात्र नाहीं असें कोणास म्हणतां येणार नाहीं.

तेव्हां अशा सर्वव्यापी परमेश्वरास व नादास शरण जाऊन ह्यापुढील भाग त्यानीं लिहवून घ्यावा अशी त्यांची प्रार्थना करितों.

———

माया व नादमाया.

कोणतेंही कार्य घडण्यापूर्वीं त्या कार्यासंबंधीं मनांत कल्पना उत्पन्न होऊन तें कसें करावें ह्याविषयीं विचार उत्पन्न होतात. त्याचप्रमाणें परमेश्वराचे मनांत कांहीं उत्पत्ति करण्याची जी कल्पना आली तीसच माया अशी संज्ञा देतात. परमेश्वराचा देह आपल्या सारखाच असून मन, कल्पना, विचार इत्यादि गोष्टी त्याचेठिकाणीं संभवतात किंवा कसें हा एक प्रश्न आहे. परंतु परमेश्वरास आपल्यासारखा मर्त्यदेह नाहीं तरी कार्य करण्यापूर्वीं त्यासंबंधीं इच्छा, कल्पना, प्रवृत्ति किंवा कांहींतरी उत्पन्न झालें पाहिजे त्याशिवाय कार्य घडणें अशक्य आहे. बरें असें कांहींएक न घडतां सहज त्याचेकडून सृष्टीची उत्पत्ति झाली असें म्हटलें म्हणून आमचें कांहीं बिघडत नाहीं. सृष्टी परमेश्वरानें निर्माण केली असें साधें वाक्यसुद्धां पुरे आहे.

सृष्टी ही परमेश्वराची उत्पत्ति आहे व ती परमेश्वरी नियमानुसारच वागणारी आहे त्याविरुद्ध वर्तन करणें अशक्य आहे. सृष्टी ही अमुल्य वस्तु आहे व तिचें मोल करूं पाहणें व्यर्थ आहे. ह्या पृथ्वीचे (सृष्टीचे) उत्पत्तीस जें कारण झालें तीच माया होय. सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वीं परमेश्वराची जी मनःस्थिति तीस माया असें म्हटलें तरी चालेल. माया ही कल्पनाच असल्यामुळें तिला देह नाहीं.

सिद्धांतामध्यें बिंदु हा कल्पावा लागतो. त्या बिंदूपासून रेषा, त्रिकोण, चौकोन, वर्तुळ वगैरे निर्माण झाली असें आपण मानतों. बिंदु दाखवितांना त्यासाठीं कांहीं जागा व्यापावी लागते. तशी जागा व्यापली असूनही आपल्या बिंदूस लांबी, रुंदी, किंवा उंची नाहीं असें मानतों व त्यावर सिद्धांतशास्त्राचा पाया रचितों. बरें एखादा हट्टी मनुष्य दुराग्रह घेऊन बसला कीं ज्या अर्थीं बिंदु दर्शविण्यास कांहीं जागा अडवावी लागते त्या अर्थीं बिंदूला लांबी, रुंदी, उंची ह्या गोष्टी आहेत. बिंदूस लांबी, रुंदी, उंची ह्या गोष्टी आहेत कीं नाहींत हा प्रश्न बाजूला ठेवून पाहिल्यास सिद्धांतशास्त्र खरें आहे असें सिद्ध होईल. बिंदूस लांबी, रुंदी,

उंची आहे हें मानून त्या शास्त्रावर विश्वास ठेवावा किंवा न मानून ठेवावा म्हणजे झालें! बिंदूची आपणास दुसरीही एक व्याख्या बनवितां येईल.

ज्यास लांबी रुंदी व उंची नाहीं अशा सूक्ष्म अदृश्य अशा पदार्थापासून बिंदूची उत्पत्ती होते व मग त्यास स्वरूप प्राप्त होतें. त्याठिकाणीं सूक्ष्म व अदृश्य असा जो पदार्थ तीच माया होय. बिंदु ही सृष्टि होय. बिंदूसाठीं सूक्ष्म व अदृश्य पदार्थ निर्माण करणारा परमेश्वर होय.

रसायनशास्त्राचा पाया रचतांना पदार्थांचे सूक्ष्म परिमाणु हे अखंड आहेत. त्यांचे विभाग होणें अशक्य आहे; ह्या गोष्टी गृहित धरून चालावें लागतें. त्याचप्रमाणें बिंदूस लांबी, रुंदी, उंची नाहीं असेंही मानून सिद्धांतशास्त्रास प्रारंभ करितात.

सर्व सृष्टी नादानें भरली आहे. हे सर्व नाद उत्पन्न होण्याचें जें कारण ती माया होय. ह्या नादापासूनच गायनशास्त्र निर्माण झालें. निर्जीवापासून जो नाद उत्पन्न होतो. त्याला "आवाज" असें म्हणतात. सजीव पदार्थांचे गळ्यांतून जो आवाज निघतो त्याला "स्वर" किंवा शब्द असें म्हणतात. आवाज, स्वर किंवा शब्द उत्पन्न होण्यास जें कारण झालें ती माया होय. माया म्हणजे कार्य करण्याची प्रवृत्ती होय. किंवा कार्य करण्याची कल्पना मनांत येणें ही माया. ह्या मायेचें अस्तित्व कार्य पुरें होईपर्यंत असतें व कार्य झालें म्हणजे माया अदृश्य होते.

नाद, स्वर किंवा शब्द, उत्पन्न होण्यापूर्वीं मनामध्यें तसें करण्याची इच्छा उत्पन्न होते. ही इच्छा आत्म्यास झाली म्हणजे तो मनास प्रेरणा करतो. मग नाद, स्वर किंवा शब्द उत्पन्न होतो. ही नाद उत्पन्न करण्याची जी इच्छा उत्पन्न झाली ती माया होय म्हणून माया व नादमाया ह्यामध्यें साम्य आहे.

सृष्टी व स्वर.

सृष्टी ज्याप्रमाणें ईश्वरीशक्तीनें भरून गेली आहे त्याप्रमाणें ती नादानें भरून गेलेली आहे. सृष्टीचे उत्पत्तीस माया जशी कारण आहे त्याचप्रमाणें नादाचे उत्पत्तीसही तीच कारण होय. सृष्टपदार्थांचे ज्याप्रमाणें सचेतन, अचेतन, जड, पातळ व वायूमय असे भाग आहेत त्याप्रमाणें नादाचे आवाज, स्वर, शब्द वगैरे भेद आहेत.

गायनशास्त्राचा पाया स्वरांवर बसविलेला आहे. तबला, सारंगी, सतार, पेटी, चौघडा, ताशा, तंबोरा वगैरे कातड्याचीं व तारेचीं वाद्यें, ह्यांपासून निघालेला आवाज व जनावरें, पक्षी व मनुष्यें ह्यांपासून निघालेल्या आवाजासही स्वर असेंच म्हणतात.

सारंगी, सतार, बीन वगैरे तंतुवाद्यांपासून निरनिराळे आवाज निघतात. त्याचप्रमाणें चौघडा, मृदंग, तबला, संबळ वगैरे वाद्यांमध्येंही निरनिराळे म्हणजे उंच, नीच असे आवाज निघूं शकतात. त्याचप्रमाणें मनुष्यही उंच, नीच असे आवाज काढूं शकतो. ह्या सर्व पदार्थांचे आवाजास " स्वर " असें म्हणतात. जनावरें व पक्षी ह्यांचे आवाज एकच प्रकारचे असतात. त्यांत उच्चनीचपणा होऊं शकत नाहीं तरीसुद्धां त्यांस स्वर असें म्हणतात. परंतु त्यांचे स्वरामध्यें उच्चनीचपणा नसल्या मुळें ते एकाच सुरांत ओरडतात; त्यांस एकस्वरी असें म्हणतात. ह्या एकस्वरी ओरडणाऱ्या निरनिराळ्या प्राण्याच्या आवाजामध्यें कमी जास्तपणा ठरवून त्यावरूनही उच्च नीच स्वरांचा शोध लाविलेला आहे.

खालीं दर्शविलेल्या कीटकांचे, पक्ष्यांचे व जनावरांचे आवाज एकापेक्षां एक असे चढते आहेत.

१ मोर.	४ क्रौंचपक्षी.	७ हत्ती.
२ गाय किंवा चातक.	५ कोकिला.	
३ मेंढा किंवा बकरा	६ बेडूक किंवा घोडा.	

वरील प्राण्यांचे आवाज एकापेक्षां एक चढ असे निघतात. व असे चढते आवाज मनुष्यही काढूं शकतो. अशातऱ्हेचे उच्च नीच आवाज काढले म्हणजे ते कानास फार गोड लागतात. ही गोष्ट मनुष्याचे ध्यानांत आल्याबरोबर त्यानें असे उच्च नीच आवाज बसवून त्या पासून गायनसृष्टी निर्माण केली.

आत्मा व षड्ज.

सर्व चराचर, चेतन अचेतन पदार्थ परमेश्वर शक्तीनें भरून गेले आहेत. प्रत्येक पदार्थांत एक प्रकारची शक्ति भरलेली आहे. पदार्थांचे गुणधर्म जरी निराळे असले तरी ही शक्ति एकच प्रकारची आहे. ह्या शक्तीच्या योगानें प्रत्येक पदार्थामध्यें कांहीं विशेष गुण दृष्टीस पडतात. ह्या शक्तीस ब्रम्ह किंवा आत्मा अशी संज्ञा आहे. आत्मा हा शब्द चेतन पदार्थाकडे लावण्याचा सांप्रदाय आहे व ब्रम्ह हा शब्द सर्व पदार्थांस लावण्यांत येतो. वास्तविक ह्या दोन्हीं शब्दांत कांहीं फरक नाहीं. ब्रम्ह किंवा आत्मा ह्यास परमेश्वराचा अंश असेंही म्हणतात ब्रम्ह किंवा आत्मा ही शक्ति परमेश्वरानें निर्माण केली व जगाचे आस्तित्वास ह्या शक्तीची फारच आवश्यकता आहे. ही शक्ति म्हणजे जगाचा प्राण आहे.

सृष्ट पदार्थ जरी निरनिराळे गुणधर्मांचे दिसले तरी त्यांचें चालकत्व परमेश्वराकडे असल्यामुळें ते परमेश्वरशक्तीचे अंश असें म्हटलें तरी हरकत नाहीं. ह्या शक्तीच्या रूपानें परमेश्वर सर्वत्र भरला आहे. त्यानें ह्या शक्तीनें सर्व पदार्थांस नियमबद्ध करून ठेविलें आहे. षड्ज ही एक शक्ती आहे. हा ईश्वरी अंश आहे. सर्व नाद षड्जरूपानें भरला आहे. आपल्याला जो आवाज ऐकूं येईल तो षड्ज होय. पेटीमध्यें जरी निरनिराळे आवाज क्रमानें लावलेले आहेत, तरी त्यांपैकीं वाटेल तो सूर षड्ज असें कल्पून आपणांस गातां येतें. पेटींतील सर्व आवाज, सतारीच्या पडद्यांतील सर्व आवाज, इतर वाद्यांपासून निघालेले सर्व आवाज हे षड्ज आहेत. ह्यांना दुसरीं नांवें देणें ही नुसती कल्पना आहे. ही मनुष्यकृत गोष्ट आहे. ही कृत्रिम आहे. ह्यामध्यें खरेपणा नाहीं.

जग जसें सर्वत्र परमेश्वरशक्तीनें भरून गेलेलें आहे तसेंच सर्वनाद षड्जमय आहे. षड्जाशिवाय दुसरा कोणताही नाद नाहीं. त्याला मरण नाहीं. आवाज ऐकिल्यानंतर तो नाहींसा झाल्यासारखा वाटतो परंतु पुन्हा उत्पन्न होऊं शकतो. आत्मा, ब्रम्ह, किंवा परमेश्वरशक्ति ह्या अमर आहेत. ही शक्ति कांहीं काल जरी आपणांस नष्ट झाल्यासारखी वाटली

तरी ती पुन्हां उदय पावते. ही शक्ति निराकार आहे म्हणूनच ती निर्माण करणाराही निराकारच असला पाहिजे अशी साहजिक कल्पना होते; परंतु ही शक्ति एखाद्या वस्तूमध्यें घालून परमेश्वर त्याला आकार देतो तेव्हां प्रत्यक्ष त्याला आकार नसेल असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. षड्ज ह्याला आत्म्याप्रमाणें मरण नाहीं आत्म्याचें किंवा षड्जाचें मरण म्हणजे त्याचा दुसरा जन्म होय. हा जन्म म्हणजे षड्जाची सुरवात नव्हे ही त्याची गति आहे. आपण ऐकला तो षड्ज खरा पण तो ऐकला तेव्हांच जन्माला आलेला नाहीं तो आत्म्याप्रमाणें किंवा कालाप्रमाणें मागें होता, आतां आहे व पुढेंही असेलच. षड्ज हा ईश्वरी अंश आहे व तो गायनशास्त्राचा आत्मा होय. हा कांहीं करीत नाहीं पण ह्याचेशिवाय कांहीं चालत नाहीं. हल्लीं गाणाराचें गाणें तबकडीमध्यें धरून ठेवितां येतें. तें वाटेल तेव्हां आपणांस यंत्र सुरू करून ऐकतां येतें. ह्या यंत्रास फोनोग्राफ किंवा ग्राफोफोन असें म्हणतात. एकदा गाणें घेतल्यावर मग तो गाणारा मरण पावला तरी त्याचें गाणें मागें रहातें ह्यावरून आवाजाला मरण नाहीं हें सिद्ध होतें. हा जसा मनुष्याचा आवाज तो मेल्यानंतरही कायम राहातो, (फक्त तो त्याचे मुखांतून बाहेर पडून जातो व पुन्हा वाटेल तेव्हां प्रकट करतां येतो.) ह्याच प्रमाणें आत्म्याची गोष्ट आहे. आत्मा शरीरास सोडून गेला म्हणजे तो नाहींसा झाला असें वाटतें खरें, परंतु तो आवाजाप्रमाणें शरीरांतून निघून दुसरा देह धारण करतो.

जीव व षड्ज.

चेतन पदार्थांना " जीव " आहे. जीवाला आस्तित्व आहे. जीव ही एक स्वाभाविक शक्ति आहे. ही शक्ति उत्पन्न होण्यास शरीर कारण आहे. शरीरामध्यें आत्म्यानें प्रवेश केला कीं शरीरास चलनवलनाची शक्ति येते. विजेच्या दोन तारा एके ठिकाणीं जोडल्याबरोबर जशी त्यामध्यें एक तऱ्हेची शक्ति उत्पन्न होते त्याप्रमाणें आत्मा व शरीर हीं एकमेकांस जोडलीं म्हणजे जी शक्ति उत्पन्न होते तीस जीव असें म्हणतात.

आत्मा व शरीर ह्यांचें एकीकरण आहे तोंपर्यंत प्राणीमात्रांचें अस्तित्व असतें आत्मा व शरीर ह्यांचें एकीकरण फक्त एकच करूं शकतो व त्यालाच " परमेश्वर " असें आपण म्हणतों. ह्या दोहोंच्या एकीकरणापासून प्राण्यास जीव प्राप्त होतो. जीव ही मोठी शक्ति आहे व त्यामुळेंच आपण खातों, पितों व अनेक कृत्यें करतों फार काय, त्या पासूनच मनास सुख किंवा दुःख करून घेतों. जगाच्या उत्पत्तीस द्वैत कारण आहे म्हणून सृष्टीच्या उत्पत्तीस परमेश्वर आणि माया हीं कारण आहेत असें आपण मानितों. ह्याचें कारण जगांत जो उत्पत्तीचा नियम त्यानें घालून दिला आहे त्यामध्येंही द्वैतच कारण होतें. बीज उत्पन्न करण्यासाठीं दोन तारा (पुरुष व प्रकृति) जोडाव्या लागतात. मनुष्य, जनावरें, पक्षी, मासे, जीवजंतु, वृक्ष, धान्यें, फुलें, फळें ह्यांचे उत्पत्तीस स्त्री व पुरुष हीं कारण आहेत. वृक्षांमध्यें स्त्री व पुरुष हीं दोघें निरनिराळीं दिसत नाहींत परंतु स्त्री व पुरुष ह्या दोहों गुणाचें एकीकरण त्यांचे बीजामध्यें असतें. ज्या बीजामाध्यें ही जोडशक्ति नसते तीं बीजें कितीही चांगलीं असलीं तरी उगवत नाहींत. एकट्या पुरुषापासून किंवा स्त्रीपासून संतती होणें अशक्य आहे. परमेश्वरानें पुरुष व स्त्री हीं जीं निर्माण केलीं ह्याचें कारण हेंच कीं त्यांनीं एकमेकांवर अवलंबून राहून संसारसुख उपभोगावें व त्यांजपासून संततीही व्हावी पुरुष व स्त्री हीं दोन्ही जरीं निराळीं आहेत तरी त्यांचें एकमेकांशिवाय चालावयाचें नाहीं. कारण संततीची गोष्ट जरी बाजूला ठेविली, तरी इतर संसारांतील सर्व सुखें दोघांच्या मैत्रीवांचून प्राप्त होणार नाहींत. आणि ह्या मैत्रीची कल्पनाच एकमेकांविषयींच्या प्रेमास कारण होते. उत्पत्ति करणें हें आपले हातीं नाहीं. उत्पत्ति जरी स्त्री व पुरुष ह्यांपासून होते तरी तीस तीं फक्त कारण होतात. मनुष्याचे हातून कांही एक उत्पन्न होत नाहीं. उत्पन्न करण्याची शक्ति फक्त परमेश्वरासच आहे. त्या उत्पत्तीस सर्व पदार्थ कारण होतात. चेतन पदार्थ अनेक प्रकारचे आहेत. ह्या सर्वांपासून अशीच उत्पत्ति होते.

वरवर विचार केला तर ही उत्पत्ति आपण केली असें मनुष्य म्हणतो परंतु ज्या दिवशीं गर्भधारणा झाली तो काळ कोणास कळत नाहीं.

गर्भामध्यें काय आहे ह्याचाही पत्ता नसतो. मग आह्मीं उत्पन्न केलें ह्या ह्मणण्यांत काय अर्थ आहे ? उत्पत्तीस प्राणी कारण आहे व प्राण्याला अस्तित्व आहे त्याचप्रमाणें गायनशास्त्रांतील स्वरांची उत्पत्ति होण्यास षड्ज कारण आहे. ह्या षड्जापासून ज्यावेळीं आपणांस स्वर निर्माण करावयाचे असतात, त्यावेळीं आपण त्यास अस्तित्व दिलें पाहिजे म्हणजे त्याला जन्म दिला पाहिजे. ह्या षड्जाचा जन्म गाणारा व त्याची इच्छा (माया) ह्यांपासून होतो. षड्जास अस्तित्व दिलें पाहिजे नाहींतर सर्वच आवाज षड्ज आहेत.' पण एका आवाजापासून काय उत्पन्न होणार ? प्रत्यक्ष एकट्या परमेश्वरास जर मायेशिवाय जग निर्माण करतां आलें नाहीं, तर सर्वत्र एकच आवाज भरलेला आहे अशा स्थितींत अनेक स्वरांचें गायनशास्त्र कसें निर्माण होईल ? गायकाचे मनांत गाण्याचें आल्याबरोबर तो एक स्वर कायम करतो व मग त्याहून उच्च किंवा नीच स्वर काढतो. हा जो कायम स्वर होतो तो षड्जाचा जन्म होय. हा कायम स्वर म्हणजे पुढील सर्व स्वरांचा जीव होय. हा कायम स्वर सोडून त्याहून उच्च, नीच स्वर घेऊन गातां येणें शक्य नाहीं. हा कायम स्वर सर्वत्र भरलेल्या नादाचा अंश आहे व ह्या अंशास जेव्हां आपण स्थिर करतों म्हणजे अस्तित्वांत आणतों तेव्हां त्याला एकप्रकारची शक्ति येते. ह्या शक्तीपासून गायकाला गायनसृष्टी निर्माण करतां येते. नुसत्या आत्म्याला जसें कांहीं करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें नुसत्या षड्जालाही कांहीं करतां येत नाहीं. परंतु आत्म्याची स्थापना देहामध्यें केली म्हणजे अर्थात् त्यास अस्तित्व दिलें म्हणजे त्यामध्यें एकप्रकारची शक्ति येते; त्यालाच जीव अशी संज्ञा आहे. त्याचप्रमाणें षड्जाला अस्तित्व ज्यावेळीं गायक देतो त्यावेळीं त्यामध्यें एकप्रकारची शक्ति उत्पन्न होते व त्यापासून गायनकला निर्माण होते. जगाचे उत्पत्तीस ज्याप्रमाणें आत्मा कारण आहे. त्याप्रमाणें गाण्याचे उत्पत्तीस षड्ज कारण आहे. प्राण्यामध्यें आत्मा, शरीर व जीव हे तीन पदार्थ मुख्य आहेत. त्यांपैकीं जीव ही उष्णता, तेज, वीज वगैरे सारखी एक शक्ती आहे. परंतु ही शक्ति नष्ट होणारी आहे. ही नष्ट होण्यास अनेक अपघात कारण होतात. ही शक्ति नष्ट होणें म्हणजेच मरण होय. ही जीवशक्ति एकदां नष्ट झाली म्हणजे

पुन्हा प्रगट करतां येण्याजोगी नाहीं. जीवाला मरण आहे पण तें आत्म्याला नाहीं. त्याचप्रमाणें कायम केलेला षड्ज नाहींसा होऊं शकेल परंतु सर्वत्र भरलेला षड्ज नाहींसा होणार नाहीं. मेलेला प्राणी जरी पुन्हा जिवंत होत नाहीं तरी परमेश्वर तसा प्राणी पुन्हा उत्पन्न करूं शकतो. त्याचप्रमाणें गायकानें कायम केलेला षड्ज खोकला आल्यामुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें जरी नष्ट झाला तरी त्याला त्याची पुन्हां उत्पत्ति करतां येईल. लहान मुलांना आपण संसाराची कल्पना होण्यासाठीं किंवा त्यांचें मनरंजन होण्यासाठीं त्यांना ज्याप्रमाणें भातुकलीचें (संसारदर्शक खेळ) साहित्य देतों त्याप्रमाणें मोठ्या माणसांची संसारदर्शक भातुकली म्हटली म्हणजे नाटक होय. ह्या नाटकामध्ये संसाराचें काल्पनिक चित्र रेखाटून त्यापासून आपण आपलें मनोरंजन व बोध करून घेतों. त्याप्रमाणें परमेश्वरानें आपणांला सृष्टीचें ज्ञान होण्यासाठीं किंवा आमचें मनरंजन होण्यासाठीं ही गायनशास्त्राची सामुग्री दिली आहे आणि म्हणूनच आपण षड्जापासून गायनसृष्टी निर्माण करूं शकतों.

शरीर व सप्तस्वर.

बीज किंवा रेत ह्यांच्या उत्पत्तिसाठीं जमीनीमध्यें किंवा उदरामध्यें त्याची स्थापना झाल्यावर त्यास मोड, पानें, ढाळ्या, फुलें किंवा रक्त, मांस, मज्या वैगेरे उत्पन्न होऊन त्यापासून वृक्ष किंवा शरीर उत्पन्न होतें; त्याचप्रमाणें षड्ज हा स्वर कायम केला म्हणजे त्यापासून स्वरदेह उत्पन्न होतो. हे मुख्य स्वर सात आहेत त्यांना षड्ज, रिषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व निषाद अशीं नांवें आहेत. ह्या सप्तस्वरांचा देह कल्पिला आहे, त्याला स्वरदेह किंवा शारीरविणा असें म्हणतात. ह्या शारीरविण्याची रचना मनुष्य देहाप्रमाणें केलेली आहे. मनुष्य देह कफ, वात,

पित्त, रक्त, मांस, मज्या, देह, अस्थि व शुक्र ह्यांचा बनला आहे. त्याच प्रमाणें ह्या सप्तसुरांचा खालीं दाखविल्याप्रमाणें गायनाचा देह बनला आहे.

स्वर.

षड्ज	=	कफ, वात व पित्त	=	अर्चिक.
रिषभ	=	रुधिर	=	गाथिक.
गांधार	=	मांस	=	सामिक.
मध्यम	=	मज्या	=	चतुरस्वर.
पंचम	=	मेद	=	ओढव.
धैवत	=	अस्थि (षाढव)	=	षाढव.
निषाद	=	शुक्र	=	संपूर्ण.

प्राण्याच्या अस्तित्वास देह जसा अवश्य आहे त्याप्रमाणें आत्मा व जीव हे दोन्हीं अवश्य आहेत. म्हणजे प्राणीमात्रास शरीर, आत्मा व जीव हे तीन पदार्थ अवश्य आहेत. त्याचप्रमाणें गायनाचे देहास आत्मा अवश्य आहे. हा आत्मा म्हणजे षड्ज होय. हाच कायम केला म्हणजे जीव उत्पन्न होतो; सप्तसुरांपैकीं षड्ज व पंचम हे दोन स्वर अचल मानले आहेत. त्यांचें स्वरूप कधींही बदलत नाहीं. शरीर जीर्ण झालें म्हणून आत्मा कांहीं जीर्ण होत नाहीं. तो कायम स्थीर असतो व देहांत तो आहे तोंपर्यंत शरीरास एक प्रकारची कांती असते व तीही आत्मा शरीर सोडीपर्यंत नाहीशी होत नाहीं. त्याचप्रमाणें गायनामधील षड्ज म्हणजे आत्मा व पंचम म्हणजे कांती असें मानले आहेत; व हे दोन्ही स्वर अचल आहेत. बाकीचे स्वर चल म्हणजे कमीजास्त होणारे आहेत. रिषभ, गांधार, मध्यम, धैवत व निषाद हे स्वर उच्च नीच होतात म्हणून त्यांस चल स्वर असें ह्मणतात.


त्रिगुण व स्वर.

देहामध्यें आत्म्याचा प्रवेश झाला म्हणजे जीव प्राप्त होतो. ह्या जीवा-बरोबरच प्राण्यामध्यें तीन गुण उत्पन्न होतात. ह्या गुणांस सत्व, रज व तम अशीं नांवें आहेत. आपल्या दृष्टीस पांढरा, तांबडा, पिंवळा, हिरवा, निळा, जांभळा, काळा हे रंग जरी निरनिराळे भासले तरी त्रिगुणाप्रमाणें तांबडा, निळा व पिंवळा हे तीन रंगच मुख्य आहेत. आपल्या दृष्टीस पांढरा व काळा हे रंग अगदीं भिन्न दिसतात; पण हे दोन्ही रंग मुख्य तीन रंगांचींच मिश्रणें होत. सृष्टीमध्यें अनेक गुणांचीं जरी मनुष्यें दिसलीं, तरी त्यांचेमध्यें सत्व, रज व तम ह्या तीन गुणाचेंच मिश्रण असणार. हे गुण परमेश्वरामध्यें पूर्ण भरलेले आहेत म्हणून " त्रिगुणात्मक परमेश्वर " असें एक नांव त्याला देतात. हे तीन गुण कमीजास्त प्रमाणानें प्राण्या-मध्यें भरले आहेत. नुसता सत्वगुण, रजोगुण किंवा तमोगुण असा एकही प्राण्यामध्यें नाहीं. त्यांत जो गुण जास्त प्रमाणांत असतो त्याप्रमाणें त्यास सत्वगुणी, रजोगुणी, किंवा तमोगुणी असें म्हणतात. फक्त पर-मेश्वरामध्यें मात्र सर्व गुण सारखे भरले आहेत. अशी कल्पना आहे व ती खरी आहे. कारण परमेश्वरास सृष्टीची उत्पत्ति करणें, ती न्यायानें चालविणें व ती नाहींशी करणें ह्या गोष्टी कराव्या लागतात व त्या बिनचूक वेळच्यावेळीं होतात. तेव्हां त्यांचे ठिकाणीं हे तिन्ही गुण सारखे असल्याशिवाय चालावयाचें नाहीं. अशातऱ्हेचे तीन गुण गाणाऱ्याचे स्वरामध्येंही आहेत. एखाद्या गायकाचा आवाज " मंजुळ " असतो. एखाद्याचा पहाडी असतो म्हणजे मोठा पण गोड असा असतो. एखा-द्याचा कर्कश असतो. प्राणीमात्रांच्या स्वभावांत ज्याप्रमाणें नुस्ता सत्व-गुण, रजोगुण, किंवा तमोगुण नसतो तर त्यामध्यें एकाचें प्राधान्य असतें त्याचप्रमाणें, गायकाचे आवाजामध्येंही पूर्ण मंजुळ, पहाडी, किंवा कर्कश, असा आढळत नाहीं तर त्या पैकीं एखादा गुण जास्त आढ-ळतो. पूर्ण शुद्ध गोष्ट फार चांगली व ह्या गोष्टीचेंच ध्येय मनुष्यानें आपले मनांत वागविलें पाहिजे; परंतु जगांत पूर्ण शुद्ध अशी वस्तु फार दुर्मिळ आहे. त्याची गोडीही साधारण लोकांस नाहीं. शुद्ध पदार्थ


वाईट असें ते म्हणत नाहींत, परंतु नुसत्या शुद्ध पदार्थावर त्यांची तहान भागत नाहीं. म्हणूनच गोड पदार्थामध्यें खारट किंवा आंबट, आंबट पदार्थामध्यें गोड किंवा खारट, खारट पदार्थामध्यें तिखट, तिखटांशीं कडू वगैरे मिसळून मूळ रसांस निराळी चव देतात. इतकेंच नव्हे, कित्येकांस तिखट, आंबट, खारट ह्या सर्व पदार्थांचें मिश्रणच गोड वाटतें, ह्याचप्रमाणें गाण्याचीही स्थिति आहे. शुद्ध राग फार थोड्या लोकांना आवडतात कारण त्या रागाची चव उत्पन्न होण्यास त्यांना गायनाची थोडी माहिती पाहिजे आणि ही माहिती करून घेण्याच्या भानगडींत कोणी पडत नाहीं; कारण जिभेप्रमाणें कानास न शिकतां शब्दांची चव समजते. अशा लोकांना कसलेंही गाणें आवडतें; फक्त गाणाराचा आवाज गोड असला म्हणजे झालें.

ज्याच्या आवाजामध्यें " गोडी " जास्त असते त्याला मंजुळ किंवा सात्विक आवाज असें म्हणावें. ज्याचा आवाज मोठा असतो त्याला पहाडी किंवा रजोगुणी आवाज म्हणावें. व ज्याचे आवाजामध्यें कर्कशपणा जास्त त्याला " काकी " किंवा तमोगुणी आवाज असें म्हणावें. विचारी पुरुषांना सत्वगुण आवडतो. संसारीपुरुषांना रजोगुण बरा वाटतो व अज्ञान लोकांना तमोगुण आवडतो. परंतु गायनामधील मंजुळ म्हणजे सत्वगुण, सर्वांना आनंद देतो. पहाडी बरा वाटतो व " काकी " नें कपाळ उठतें म्हणून खऱ्या त्रिगुणापेक्षां ह्या आवाजाच्या त्रिगुणाचा सर्वांना लवकर अनुभव पटतो. सर्व लोकांची आवाजावरच फार भिस्त असते. उत्तम गवई असून त्याचा जर आवाज चांगला नसला तर त्याचें गाणें लोकांना प्रीय वाटत नाहीं. परंतु आवाज गोड असून त्याला गाण्याची कांहीं माहिती नसली तरी त्याला ते गंधर्व समजतात! त्रिगुणाचीही तीच अवस्था आहे. सत्वगुणी मनुष्यास व्यवाहारांत नेभळा, भित्रा; रजोगुणी मनुष्यास शाहाणा, चतूर व तमोगुणी मनुष्यास शूर, पाणीदार अशीं नांवें मिळतात. म्हणूनच परमेश्वरानें तिन्ही गुणांचीं निरनिराळ्या प्रमाणांत मिश्रणें करून तीं मनुष्यांमध्यें ठेविलीं आहेत. ह्यामुळें प्रत्येक मनुष्यांत कांहीं तरी विशेष गुणाची छाया दृष्टीस पडते; ह्यामुळें तो प्रीय वाटतो.


षड्ज वंश, सृष्टीवंश; व जीववंश.



सृष्टीवंश.


परमेश्वर
आकाश
(काळ)
(वस्तु)
तेजोगोल
सृष्टी
चेतनपदार्थ
अचेतनपदार्थ—पृथ्वी
वनस्पती
सूक्ष्मजंतू
मनुष्यप्राणी
प्राणी
जलचर
स्थलचर
पक्षी
जनावर
कीटक

प्राणीवंश.


परमेश्वर.
प्राणी (मनुष्य)
आत्मा
शरीर
जीव
रज
रज
तम
शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध.
मन
अहंकार
बुद्धी (कर्मानुसार)
रोग
स्मरण
वासना
(गुणानुसार)
काम, क्रोध, मद. मोह
मत्सर, दंभ.
विचार
विवेक
ज्ञान
आनंद
शांति
रोग
मृत्यु
शांती
प्रेम
भक्ती
आनंद
शांती
क्रीया
अनुभव
फल
आ.
दुःख
शांती
शांती
उपभोग
आनंद
शांती

सृष्टीचा विस्तार व स्वरप्रस्तार.

सृष्टीच्या विस्ताराचा कोणास अंत लागला नाहीं जनावरें, पक्षी, कीटक, सूक्ष्म जंतू, मासे वगैरे जाती जरी थोड्या दिसतात तरी त्यांचे मध्यें अनेक पोटभेद आहेत. त्याचप्रमाणें जडपदार्थांमध्यें सप्तधातू म्हणजे, सोनें, रुपें, तांबें, लोखंड, शिसें, जस्त व कथील ह्या जरी मुख्य आहेत तरी हल्लीं अल्युमीनम, प्लॅटीनम, अँटीमनी वगैरे बऱ्याच धातू शिवाय उपधातू, वायुमय पदार्थ असे बरेच शोधून काढले आहेत. पक्षी, कीटक व सूक्ष्मजंतू ह्यांच्या इतक्या जाती आहेत कीं, त्या सर्वांचा शोध लावून त्यांना नांवें देण्याची पाळी आल्यास आपणांस नवे शब्द उत्पन्न करतां करतां पुरेवाट होईल ! व वनस्पतींमध्येंही हजारों प्रकार नजरेस पडतील व त्यांची ओळख करून घेणें झाल्यास एका मनुष्याचें आयुष्य पुरणार नाहीं. आपणांस जो सूर्य दिसतो त्याचा आकार आपणास लहानशा तबकडीएवढा म्हणजे सुमारें ७।८ इंच व्यासाचा असावा असें वाटतें. परंतु तो पृथ्वीपेक्षां एक लक्ष तीस हजारपट मोठा आहे व तो आपलेभोंवतीं फिरणाऱ्या उपग्रहांचे सहाशेंपट मोठा आहे. मग परमेश्वराचें वसतीस्थान या ग्रहाचे पलीकडे आहे व तो एक तेजोगोल आहे अशी कल्पना केल्यास त्याचा प्रकाश पृथ्वीवर येण्यास किती वर्षें लागतील ? ह्या सूर्यापासून उष्णता व उजेड हे पदार्थ सारखे उत्पन्न होत आहेत. ह्यांना केव्हांही खळ पडलेला नाहीं. त्या उजेडाचे व उष्णतेचे तीव्रतेमध्येंही कमीपणा कधीं आलेला नाहीं. इतर ग्रहमालेचे तेजापेक्षां सूर्याचें तेज प्रखर आहे. सूर्यापासून जशी उष्णता उत्पन्न होते तशी इतर ग्रहांपासून होत नाहीं.

चंद्र, गुरु, मंगळ, बुध, शुक्र वगैरे सर्व ग्रह व त्यांचे उपग्रह हे सूर्याभोंवतीं फिरतात व सूर्य मध्यावर स्थीर असतो.

पृथ्वी, हवा व पाणी ह्यामध्यें प्राण्याचें जें चलनवलन होतें त्यास मुख्य कारण सूर्यकिरणें आहेत. अंधारांत एखादें झाड ठेवल्यास त्याची तेथें वाढ होत नाही. त्याच प्रमाणें अंधारांत एखाद्या मनुष्यास कोंडून

ठेविल्यास त्याची प्रकृती क्षीण होऊं लागते. सूर्यप्रकाश (उष्णता) एकदम जर बंद झाला तर प्राणीमात्रांचें चलनवळन बंद होऊन सर्व प्राणी मरण पावतील, कारण उष्णतेशिवाय वनस्पती व प्राणी जगत नाहींत, म्हणूनच शरीरांतील उष्णता नाहींशी झाल्यावर मरण येतें. वठलेलीं झाडें व प्राणीमात्रांचीं प्रेतें हीं थंड लागतात. जडपदार्थामध्यें जीव नसल्यामुळें ते नेहमीं थंड असतात. पृथ्वीपासून सूर्य ३८०००००० तीन कोटी ऐशीं लक्ष मैल अंतरावर आहे. सूर्याच्या उपग्रहांपैकी गुरु सर्वांतमोठा आहे व तो पृथ्वीच्या १४०० (चौदाशें) पट मोठा आहे व तो सूर्यापासून २० कोटी मैल अंतरावर आहे. आकाशगंगेमध्यें जे अनेक तारे आहेत त्यांमध्यें आपल्या सूर्यासारखे १८००००००(एक कोटी ऐशींलक्ष) सूर्य आहेत! त्यांचा उजेड पृथ्वीवर येऊन पोंचण्यास निदान ५० लक्ष वर्षें लागतील. आणि अशा सूर्यांच्या पलीकडे दुसरे तारे नसतील कशावरून? आकाशाचा अंत लावणें मनुष्यशक्ती बाहेरचें आहे.

ह्या सृष्टीचा विस्तार जसा अकल्पनीय आहे त्याच प्रमाणें आपणांस जरी मुख्य सातच सूर दिसतात तरी त्यांपासून अनेक सूर उत्पन्न केले आहेत, त्यांच्या मिश्रणानें अनेक सुस्वर ध्वनी उत्पन्न होतात; त्यांचें थोडेंसें वर्णन करूं. षड्ज कायम केला म्हणजे त्यापासून मुख्य सहा स्वर उत्पन्न, होतात. त्यांस षड्ज, रिषभ वगैरे नांवें आहेत. त्यांचीं संक्षिप्त नावें सा, रे, ग, म, प, ध, नी. अशीं आहेत. गातांना षड्ज, रिषभ, असें म्हणून त्या त्या आवाजांत म्हणणें जड पडतें म्हणून गातांना किंवा गायन शिकवितांना ह्या एकाक्षरी संक्षेप नांवाचाच उपयोग करतात. ह्या सहा स्वरांमध्यें स्वाभाविक जें अंतर आहे त्याचे दोन प्रकार आहेत. त्यांस पूर्णांतर व अर्धांतर अशीं नावें आहेत. सा–रे–ग ह्या तीन स्वरांमध्यें सारखें अंतर आहे. म–प–ध ह्या तीन स्वरांमध्यें सारखें अंतर आहे. ग–म व नी–सा ह्या दोन दोन स्वरांमध्यें अर्धांतर आहे व ते खालीं दाखविले आहेत.

अंतरावरचे स्वरास कोमळ निषाध असें म्हणतात, नी–सा ह्यामध्यें निम्में अंतर असल्यामुळें त्याचे अर्ध्या अंतरावरील स्वर कायम करितां येत नाहीं,

ह्यावरून आपले लक्षांत आलें असलेंच कीं, सा व प ह्यांचे मात्र कोमळ किंवा तीव्र स्वर नाहींत; परंतु रिषभ, गांधार, धैवत व निषधाचे कोमळ स्वर होतात व मध्यमाचा तीव्र स्वर होतो, म्हणजे ह्या सात स्वरांचे बारा स्वर होतात,

सा—रे—ग—म—प——ध—नी—

कोमळरी को. ग. तीव्र म. को धैवत. को. निषाद.

शुद्ध स्वर व कोमळ स्वर किंवा तीव्रस्वर ओळखण्यासाठीं स्वराखालीं ० अशी खूण केली आहे.—

सा रे रे ग ग म म प ध ध नी नी.

० ० ० ० ०

पेटी किंवा अचल थाटाच्या सतारीमध्यें हे बारा स्वर असे ओळीनें असतात.

तंतुवाद्यामध्यें जरी वरील बाराच स्वर असतात, तरी तारेपासून मींड किंवा गमक काढली म्हणजे पूर्णांतराच्या शुद्ध स्वराच्या $\frac{1}{4}$ अशा अंतरावरचाही आवाज निघतो. अशा तऱ्हेचा आवाज कित्येक गवई काढूं शकतात. अशा सूक्ष्म आवाजांना श्रुती असें ह्मणतात. ह्या एकंदर श्रुती २२ आहेत; त्यांतून वरील १२ (बारा) स्वर वजा केले म्हणजे १० (दहा) श्रुती राहतात. हे १० (दहा) स्वर फारच सूक्ष्म असल्यामुळें ते सर्व काढण्याचा प्रयत्न करणें अवघड आहे; परंतु श्रमानें हे १० (दहा) सूक्ष्म आवाज काढतां येतात. ह्या बावीस श्रुती व त्यांचे स्वरांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

अ = अति, को = कोमल, ती = तीव्र.

शुद्ध स्वर.	श्रुती.
१ सा	छंदोवती.
२ अ. को. रि.	दयावती.
३ को. रि.	रंजीका.
४ री	रंतीका.
५ ती. री.	रौद्री.
६ अ. को. ग.	क्रोधा.
७ को. ग.	वाज्रका.
८ ग	प्रसरणी.
९ ती. ग.	प्रीति.
१० को. म.	मार्जनी.
११ **म**	क्षिती.
१२ ती. म.	रक्ता.
१३ अ ती. म	संदीपनी.
१४ **प**	आलापिनी.
१५ अ. को. ध.	मदंती.
१६ को. ध.	रोहिणी.
१७ **ध**	रम्या.
१८ ती. ध.	उग्रा.
१९ अ. को. नि.	क्षोभिणी.
२० को. नि.	मंदा.
२१ **नी.**	कुमुद्वती.
२२ ती. नी.	तीव्रा.

गायनशास्त्रामध्यें ह्या सर्व श्रुती साध्य करून घेणें ही मुख्य महत्वाची गोष्ट आहे. साधारण गाण्यामधें १२ स्वर आले ह्मणजे पुरे होतात. मनुष्याचा साधारणपणें तीन सप्तकें पर्यंत आवाज चढूं शकतो. कित्येकांचा त्याहूनही एक दोन स्वर वर पर्यंत चढतो. कित्येकांचे तीन सप्तकाहून कमी स्वर लागतात; परंतु साधारणपणें तीन सप्तकें आवाज लागतो असें धरून स्वराचीं मुख्य तीन सप्तकें मानलीं आहेत. मनुष्याचा सहज आवाज मधल्या सप्तकापासून लागतो. ह्या सप्तकास मध्य सप्तक असें म्हणतात. षड्जापासून वर आवाज चढवीत जाणें ह्यास आरोह असें म्हणतात व षड्जापासून उतरतें आवाज काढले म्हणजे त्यास अवरोह असें म्हणतात.

मध्य सप्तकाचे खालच्या सप्तकास मंद्रसप्तक असें म्हणतात कित्येक ह्यास खर्ज सप्तक असेंही म्हणतात. मध्य सप्तकाचे वरच्या सप्तकास तार सप्तक असें म्हणतात.

मनुष्याचा आवाज साधारणपणें तीन सप्तकें चढतो असें धरल्यास तो २१ शुद्ध स्वर काढूं शकतो व विकृत स्वरासह ३६ स्वर निरनिराळे कंठांतून काढतो; परंतु ज्यानें सर्व श्रुती साध्य करून घेतल्या त्याचे कंठांतून ६६ तऱ्हेचे निरनिराळे आवाज निघूं शकतील पहा सर्व आवाज सारखे असून त्यांपैकी एक आवाज कायम करून त्यापासून मनुष्यानें ६६ नवीन स्वर उत्पन्न केले. ह्या स्वरांपासून मनुष्यप्राणी आपली करमणूक करून घेत आहे. पहिले फक्त सात शुद्ध स्वर घेऊन त्याचा बीजगणीतांतील पविृत्तीचे नियमानुसार म्हणजे सा, सारे. सारेग, सारेगम, असे एकपासून सात स्वरांचे निरनिराळे समुदाय घेऊन जर विस्तार केला तर पुष्कळ विस्तार होईल. एक स्वराचा विस्तार कांहीं होणार नाहीं. त्याप्रमाणें दोन स्वरांचा विस्तार दोनच होईल. उ० सारे–रेसा तीन स्वरांचा विस्तार ६ होईल व सात स्वरांचा विस्तार ५०४० होईल, हें खालील कोष्टकामध्यें दाखविलें आहे:—

सात स्वरांचा प्रसार.

१	२	३	४	५	६	७
सा	रे	ग	म	प	ध	नी.
१	२	६	२४	१२०	७२०	५०४०

बावीस श्रुतींचा विस्तार तर फारच वाढतो त्याची कल्पना येण्यासाठीं त्याचा विस्तार दिला आहे.

१३	६२२७०२०८००
१४	८७१७८२९१२००
१५	१३०७७७४३६८०००
१६	२०९२६३८९८८८०००
१७	३५५७४८६२८०९६०००
१८	६४०३४७५३०५७२८०००
१९	१२१६६६०३०८०८८३२०००
२०	२४३३३२०६१६१७६६४००००
२१	५१०९९७३२९३९७०९४४००००
२२	११२४१९४१२४६७३६०७६८००००

बावीस स्वरांचा प्रस्तार २२ आकड्यांपर्यंत आला. आतां ह्या पुढें तीन सप्तकांचा म्हणजे ६६ स्वरांचा प्रस्तार केल्यास तो केव्हढा वाढेल ह्याची कल्पना करावी. एकंदरींत सृष्टपदार्थांचा जसा अंत नाहीं तसा ह्या स्वरप्रस्ताराचाहि अंत नाहीं, असें म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. अशा तऱ्हेच्या प्रस्तारासंबंधी एक गोष्ट आहे. बुद्धिबळांचा खेळ मूळ एका चिनी ग्रहस्थानें शोधून काढला. हा खेळ शोधून काढल्यावर त्याने तो चिनच्या राजास खेळून दाखविला. हा खेळ पाहून तो राजा

फार खुष झाला व त्यानें त्यास वाटेल तें बक्षिस माग म्हणून सांगितलें. हा चिनी मनुष्य चांगला गणिती होता त्यानें सांगितलें कीं, महाराज मला जास्त कांहीं नको, ह्या बुद्धिबळाच्या घरामध्यें ६४ चौसष्ट घरें आहेत व आपल्या खजिन्यामध्यें तर पैसे पुष्कळ आहेत. तेव्हां भूमिती श्रेढीप्रमाणें पहिल्या घरांत एक, दुसऱ्या घरांत दोन, तिसऱ्या घरांत चार, चौथ्या घरांत सोळा, पांचव्या घरांत दोनशें छपन्न ह्याप्रमाणें प्रत्येक घरांत येणाऱ्या रकमेनें एकमेकांस गुणून जो गुणाकार येईल अशी रक्कम प्रत्येक घरांत ठेवावी व ह्या चौसष्ट घरांतील रक्कम मला द्यावी. राजास ही गोष्ट प्रथम हलकी वाटली. परंतु पुढें हिशेब जेव्हां १०० आंकड्यांच्या वर जावूं लागला तेव्हां त्यानें आपलें वचन पाठीमागें घेऊन त्यास कांहीं गांव बक्षीस दिले. ह्याच गोष्टीप्रमाणें स्वरप्रस्ताराची व सृष्टपदार्थांची गोष्ट आहे. त्याचा अंत मनुष्यास लागणें अशक्य आहे.

बुद्धि व राग.

मनुष्याला इतर प्राण्यापेक्षां ज्या विशेष देणग्या परमेश्वरानें दिलेल्या आहेत त्या "प्रबल विचारशक्ती व "वाचा" ह्या होत. प्रबल विचारशक्ती म्हणजे मन होय. मन हें जीवाप्रमाणें आपल्याबरोबर जन्मास येतें किंवा मन हा एक जीवच आहे. जीव शरिराच्या गात्रांस चलनवलन देतो. मन 'विचारास चलनवलन देतें. मनाच्या हातून प्रत्यक्ष कांहीं कार्य होत नाहीं. मन म्हणजे विचाराचे तरंग होत. मनाचें स्थान मेंदू आहे, तें कल्पनेची माया उत्पन्न करितें. त्यामुळें तें वाटेल तेथें जाऊं शकतें मनुष्यानें पाहिलेल्या हजारों कोसांवरच्या स्थानाला तें तात्काळ जातें त्याचा वेग विद्युत्शक्तीहूनही प्रबल आहे. स्मरण शक्तीही मेंदूमध्येंच राहाते. ती तेथें घडलेल्या गोष्टीचें टिप्पण करून ठेविते. ज्यावेळीं घडलेल्या गोष्टींची माहिती लागेल त्यावेळीं स्मरणशक्ती आपलें करून ठेविलेलें टिपण पाहाते व मग मनास सांगते. एखादेवेळीं फार जुन्या गोष्टींचें टिपण स्मरणशक्तीस सांपडत नाहीं. स्मरणशक्तीस मेंदूमध्यें

टांचण ठेवण्यासाठीं कांहीं नियमित जागा मिळालेली आहे. ह्यामुळें नवीन घडलेल्या गोष्टींचें टिपण करण्याचे वेळीं जेव्हां जागा नसते तेव्हां फार जुन्या गोष्टी पुसून टाकून ती त्याठिकाणीं नव्या लिहितें; ह्यामुळें कित्येक गोष्टी आपण अगदीं विसरून जातों.

स्मरणशक्ती ही मनाची अर्धांगी आहे. गत गोष्टींचें स्मरण, स्मरणशक्तीस झालें कीं ती मनास त्या संबंधी हकीकत सांगते. ती ऐकिल्याबरोबर मनाचे तरंग पुन्हा सुरू होतात, मनाची कल्पनाशक्तीही मोठी प्रबल आहे. पाहिलेल्या गोष्टींची कल्पना मन फार चांगली करतें, मनाच्या कल्पनाशक्तीपुढें कवींची कल्पनाही फिकी पडते. पुढें होणाऱ्या किंवा केल्याजाणाऱ्या गोष्टींची कल्पना मनामध्यें उत्पन्न झाली कीं त्या कल्पनेचें एक जगच निर्माण करून त्यावर मन राज्य करूं लागतें. नुसत्या मनाच्या हातांत जर सर्व अधिकार दिला तर व त्याप्रमाणें त्याचें वर्तन सुरू झालें तर मनुष्यप्राण्याचें जविन क्षणैक होईल. कारण मनामध्यें उत्पन्न होणार नाहीं अशी एकही कल्पना नाहीं. व त्या कल्पनेंप्रमाणें जर कार्यें घडूं लागलीं तर अनर्थ उडेल. मनुष्य व्यसनाधीन होऊन जेव्हां भांग वगैरे घेतो तेव्हां त्याचे कैफांत त्याचें मन अनिवार होतें. त्याच्या कल्पनेंचें साम्राज्य सुरू होतें. अशावेळीं आत्मघाताची कल्पना उद्भवून तिला जर अडथळा झाला नाहीं तर, ही कल्पना अमलांत येऊन मन चलनवलनशक्तीवर अंमल सुरू करून तिच्याकडून देह देखील पाण्यांत किंवा उंचावरून खालीं लोटून देतें. त्यामुळें ह्या देहाचा नाश होतो. मन अनिवार होऊन त्यास अडथळा न झाल्याकारणानें व्यसनी, वैतागी, शीघ्रकोपी अशा स्वभावाच्या लोकांचे अपघात झालेले आहेत.

अशा तऱ्हेचे अपघात होऊं नयेत व प्राणिमात्रास सुख व्हावें ह्यासाठीं परमेश्वरानें " बुद्धि " ही एक अजब चीज मनुष्यास दिली आहे. ही मनामध्यें आलेल्या तरंगांचा बरेवाईटपणा पाहून त्यांपैकीं चांगली गोष्ट कोणची व वाईट गोष्ट कोणची हें मनास सांगते, मनाचें किंवा विचारशक्तीचें एवढेंच काम आहे कीं, त्यांनीं अनेक कल्पना सुचवाव्यात. त्यांपैकीं बऱ्यावाईट कोणच्या हें सांगण्याचें काम बुद्धीचें आहे.

ही बुद्धि एक तऱ्हेची संपत्ती आहे; इतकेंच नव्हे पण खऱ्या संपत्तीपेक्षां तिचें मोल जास्त आहे. पूर्वकर्माप्रमाणें निरोगी किंवा रोगी शरीर, श्रीमंत किंवा गरीब स्थिती, उंच किंवा नीच जात वगैरे मनुष्यास प्राप्त होतात त्याप्रमाणें बुद्धीही तीक्ष्ण किंवा मंद मिळते. बुद्धीप्रमाणें त्याचे हातून उच्च नीच कृत्यें होतात.

अशा तऱ्हेच्या उच्च बुद्धीच्या लोकांनीं सप्त स्वरांपासून कानास विशेष गोड लागणारे असे निरनिराळ्या स्वरांच्या आरोहावरोहाचे राग तयार केले. ते तयार केलेले निरनिराळे राग श्रवण केले म्हणजे तयार करण्यांत त्यांनीं किती बुद्धि खर्च केली ह्याची चांगली कल्पना होते. कारण राग तयार करतांना आरोहांत किंवा अवरोहांत एखाद्या स्वराचा फरक केल्यामुळें त्या रागास निराळेपणा येऊन तो फार मधुर होतो. भाषेचे नवरस, अन्नाचे सहारस व रंगांतील तीन रंग हे किंवा एक-मेकांचीं मिश्रणें ह्यांची चव जरी निराळी असली तरी आवडीनिवडी प्रमाणें हीं सर्व प्रिय होतात. ह्याच प्रमाणें हे सर्व राग कर्णमधुर झाले आहेत. ह्यांपैकीं कित्येकांस कोमलस्वराचे किंवा शुद्ध स्वराचे राग विशेष आवडतात.

मुख्य राग सहा आहेत. त्यांस श्री, मेघ, भैरव, मालकंस, हिंडोल व दीपक असें म्हणतात. ह्या सहा रागांपासून ३६ रागिण्या निर्माण झाल्या—

१ **श्री**—जीती, धनाश्री, असावरी, मारवा, वसंत व मालश्री.

२ **मेघ**- कमला, भूपाली, गुजरी, देसकार, मल्हार व टक.

३ **भैरव**— मालती, भैरवी, बंगाली, बरारी, मधुमाधवी व सींधवी.

४ **मालकंस**—जयंती, तोडी, गौरी, गुनकली, खंबावती, कुकुभ.

५ **हिंडोल**-विभास, रामकली, पटमंजरी, देशावर, ललित व बिलावल.

६ **दीपक**-सुपालिका, देसी, नट, कान्हार, केदार व कामोद.

सहा रागांस जशा सहा रागिण्या आहेत. त्याप्रमाणें त्या प्रत्येकास आठ पुत्र व आठ सुना अशा आहेत. हल्लीं या सर्वांस राग असेंच म्हण-तात. हे सर्व राग मिळून १७८ झाले ह्या रागांचीं नांवें हल्लीं बरींच बदललेलीं आहेत. मुख्य सहा रागांपैकींही दीपक व मेघ हे राग प्रचा

रांत नाहींत. दीपकाबद्दल कामोद व मेघाबद्दल मल्हार रागिणीच गाण्याचा सांप्रदाय आहे. ह्या रागांपैकीं दोन रागांचीं मिश्रणें करूनही हल्लीं गातात व त्यास नटभैरवी, सिंधभैरवी, आनंदभैरवी, परजकालंगडा, बागेश्रीबहार, यमनकल्याण, गौडसारंग, गौडमल्हार, वगैरे नांवें दिलीं आहेत. आरोह व अवरोहाच्या स्वरांमध्यें फरक करून कित्येक गायकांनीं नवीन रागही बनविले आहेत व त्यांस मियामल्हार, मुलतानी, दरबारी-कानडा वगैरे नांवे दिलीं आहेत.

रागांच्या पांच जाती आहेत त्यांस आडव, षाडव, संपूर्ण, षाडवसंपूर्ण व आडवसंपूर्ण असें म्हणतात.

ज्या रागास आरोह अवरोहामध्यें सात स्वर व या सात स्वरांपैकीं कोमल तीव्र लागतात. त्यांस संपूर्ण राग असें म्हणतात. उ०:—भैरव, भैरवी, शंकराभरण, देश, परज, कालंगडा, बिलावल वगैरे.

ज्या रागास आरोहित सहा स्वर व अवरोहित सात स्वर येतात त्यास षाडव-संपूर्ण असें म्हणतात.

उ० खमाज, असावरी, केदारगौड वगैरे.

आरोही व अवरोहीमध्येंही सहा सहा स्वर ज्या रागास लागतात त्यास षाडव म्हणतात.

उ० केदार, कौशिक, मारवा.

आरोही व अवरोहीमध्यें पांच पांच स्वर ज्या रागास लागतात त्यास आडव म्हणतात.

उः—सारंग, भूप, मालकंस, हंसथानी.

पांच स्वरांहून कमी स्वरांचा राग होत नाहीं कारण साधारण भाषणास सुद्धां दोनपासून चार स्वर लागतात. शिवाय चार स्वरांचा राग करावा लागल्यास षड्ज कायम ठेवून दुसरे तीनच स्वर रहाणार; एक स्वर सोडून एक स्वर घेतल्यास त्यांची आरोही अवरोही गोड लागते तशी दोन सोडून लागत नाहीं. मधले दोन स्वर न सोडतां ओळीनें षड्जापासून मध्यमापर्यंत स्वर घेतल्यास तेही गोड लागत नाहींत, म्हणून राग बनवितांना पांच स्वरां पेक्षां कमी स्वरांचा राग बनविला

नाहीं. आरोहित पांच व अवरोहित सात स्वर ज्या रागास लागतात त्यास आढव संपूर्ण असें म्हणतात. उ. बिहाग, मुलतानी, जोगिया, असावरी.

स्वरप्रस्ताराप्रमाणें रागामध्यें स्वरांचे फेरफार करून गायन-शास्त्रास फारच शोभा आणिली आहे. गायन म्हणजे हे राग छेडणेंच होय. नुसत्या स्वरांचे आरोह अवरोह जर कोणी करूं लागला तर त्यापासून मनरंजन व्हावयाचें नाहीं; म्हणूनच रागाची रचना करण्यांत आली. एखाद्या स्वराच्या फरकानें रागामध्यें फरक कसा पडतो हें राग प्रत्यक्ष कानांनीं ऐकल्याशिवाय त्याची कल्पना होणार नाहीं.

हल्लीं प्रचलित असलेल्या मुख्य मुख्य रागांची थोडी थोडी माहिती देऊन हा विषय संपवितों.

रागाचें नांव.	मुख्यस्वर	आरोह अवरोह	स्वरूप.
१ श्री—	सा	सा रे ग म प ध नी. सा नि ध प म ग रे नि ध प म ग रे सा	
२ मेघ—	सा	सा रे ग म प. ध नी. सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा.	
३ भैरव—	रे	सा रे ग म प ध नी. नि ध प म ग रे सा	रे ग म प ध नी
४ मालकंस—	सा	ग म ध नी सा. सा नी ध म ग	सा ग म ध नी
५ हिंडोल—	सा	सा ग म ध नी नी ध म ग सा	सा ग म ध नी
६ दीपक—	ध	ध नी सा रे ग म प. ध नी सा रे ग म प प म ग रे सा नी ध	

रागाचें नांव.	मुख्य स्वर.	आरोह अवरोह स्वरूप.
७ असावरी—	ध	सा रे म प ध नी सा. ध नी सा म ग रे ग सा नी ध प म ग रे सा.
८ धनाश्री—	सा	सा रे ग म ध नी. सा म ध नी रे ग नी ध म ग रे सा.
९ मारवा—	सा	सा रे ग म ध नी. सा रे ग म ध नी नी ध म ग रे सा,
१० वसंत—	सा	सा रे ग म प ध नी. सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा.
११ मल्हार—	सा	सा रे ग म प ध नी. सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा.
१२ कमझा—	म	म ध ग रे सा नी ध. म ध ग रे सा नी ध ध नी सा रे ग प म.
१३ गुजरी—	रे	सा रे ग म प ध नी. रे ग म प ध नी सा नी ध प म ग रे सा.
१४ भैरवी—	म	सा रे ग म प ध नी म प ध नी सा रे ग नी ध प म ग रे सा
१५ शंकराभरण—	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
१६ शंकरा—	सा	सा रे ग प ध नी सा रे ग प ध नी नी ध प ग रे सा
१७ पहाडी—	नी	नी सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध ध प म ग रे सा नी

रागाचें नांव.	मुख्य स्वर.	आरोह अवरोह स्वरूप.
१८ खमाज— *	सा	सा ग म प ध नी सा ग म प ध नी नी ध प म ग रे सा
१९ केदार— * +	म	म प ध नी सा रे म प ध नी रे सा रे सा नी ध प म
२० कौशिक—	म	सा रे ग म ध नी म ध नी सा रे ग नी ध म ग रे सा
२१ कल्याण— +	म	सा रे ग म प ध नी म ध नी सा रे ग म नी ध प म ग रे सा
२२ भूप—	ध	सा रे ग म ध ध म रे सा ग सा ध म ग रे
२३ बिभास—	ध	सा रे ग म ध ध प रे सा ग सा ध प ग रे
२४ तिलग— *	सा	सा ग म प. नी सा ग म प ना नी प म ग सा
२५ सारंग— ०	सा	सा रे म ध नी सा रे म प नी नी प म रे सा
२६ हंसध्वनी—	सा	सा रे ग म नी सा रे ग म नी नी म ग रे सा
२७ देश *	रे	सारेगमपधनी रेगमपधनीसा नी ध प म ग रे सा

रागाचें नांव.	मुख्य स्वर.	आरोह अवरोह स्वरूप.
२८ काफी *	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
२९ गारा— ÷	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
३० बिहाग— +	सा	सा ग म प नी सा ग म प नी ग रे सा नी ध प म ग रे
३१ मुलतानी—	सा	सा ग म प नी सा ग म प नी ध रे सा नी ध प म ग रे
३२ मांड— *	नी	सा रे ग म प ध नी नी सा रे ग म प ध नी ध प म ग रे सा
३३ तोडी—	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
३४ पूर्वी—	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
३५ झींझोटी— *	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा

* ही खूण दर्शविलेल्या रागास शुद्ध व कोमल असे दोन्ही निषाद लागतात.

\+ ही खूण दर्शविलेल्या रागास शुद्ध व तीव्र असे दोन्ही मध्यम लागतात.

÷ ही खूण दर्शविलेल्या रागास शुद्ध व कोमल असे दोन्ही गंधार लागतात.

रागाचें नांव.	मुख्य स्वर.	आरोह अवरोह स्वरूप.
३६ बिलावल—	ध	सा रे ग म प ध नी ध नी सा रे ग म प नी ध प म ग रे सा
३७ जोगीया—	रे	सा रे ग म प ध नी रे ग म प ध नी सा नी ध प म ग रे सा
३८ कालंगडा—	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
३९ अडाणा—	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
४० पिलु—	सा	सा रे ग म प ध नी सा रे ग म प ध नी नी ध प म ग रे सा
४१ सोहनी—	ध	सा रे ग म ध नी सा रे ग म ध नी नी ध म ग रे सा

काल व ताल.

जगांतील सर्व वस्तूंना परमेश्वरानें नियमबद्ध करून टाकिलें आहे. त्यांचे जीवनाचा कालही नियमित करून टाकिला आहे. हा काल परमेश्वरानें जगाबरोबरच निर्माण केला आहे. हा जगाचे आयुष्यमापनास फार उपयोगी पडतो. मनुष्याचा साधारणपणें जगण्याचा जो काल त्यास आयुष्य असें म्हणतात. मनुष्याचे १०० वर्षांचे आयुष्यांपैकीं निमे (५०) वर्षे आयुष्य निद्रेमध्यें जातें. जेवणखाण वगैरे नैसर्गिक गोष्टींमध्यें १५ वर्षे

जातात. बालपणामध्यें म्हणजे आज्ञानावस्थेंत २० वर्षें, पैकीं निद्रेचीं १० वर्षें वजा जातां १० वर्षें जातात. ह्याशिवाय रोगराई, खेळ, प्रवास वगैरे मध्येंही बरेंच आयुष्य खर्च होतें. शिवाय संसार चालविण्यासाठीं कांहीं काल नोकरी धंदा वगैरेंत जातो. म्हणजे १०० वर्षें पुरें आयुष्य असलें तरी १० वर्षें तरी परमेश्वराचे स्वरूपाचा विचार करण्याकडे घालवितां येतो किंवा नाहीं याची शंकाच आहे. तेव्हां मनुष्यानें आयुष्य ही संपत्ति आहे असें समजून त्याचा व्यय फार जपून करावा. व परमेश्वराचे भक्तीमध्यें कांहीं काळ घालविण्याचा निश्चय केल्यास त्याला संसारांतील सुखदुःखाची कांहीं पर्वा वाटणार नाहीं.

मनुष्यानें आपलें आयुष्य किती आहे हें ठरविण्याचा विचार केला-हें कालमापन ग्रहांवरून शोधून काढलें. एक वर्षाचे कालांत कांहीं ग्रह फिरून पहिल्या ठिकाणीं येतात. तेव्हां त्या कालास सुमारें ३६५ दिवस लागतात. त्यास वर्ष असें म्हणतात*. अशा दिवसाचा किती भाग नाहींसा झाला हें ठरविण्यासाठीं घड्याळ शोधून काढलें. ह्या घड्याळाचे चोवीस भाग करून प्रत्येकास तास अशी संज्ञा दिली. ह्या तासाचे ६० भाग करून त्या प्रत्येक भागास मिनिट असें म्हणतात व मिनिटाचे ६० भाग करून त्या प्रत्येक भागास सेकंद म्हणतात. गायनामध्येंही प्रत्येक स्वर किती लांबवावा हें ठरविलें आहे. साधारणपणें प्रत्येक स्वर १ सेकंद पर्यंत लांबवावा. ह्या लांबविण्याचे कालास मात्रा असें म्हणतात. ह्या मात्रेचें प्रमाण साधारणपणें एक सेकंद असें जरी आहे तरी १ सेकंद पासून $\frac{1}{2}$ सेकंद पर्यंत ह्याची सीमा झाली आहे. कारण कित्येक गायक

---

* इंग्रजी वर्ष व हिंदी वर्ष ह्यामध्यें बरेंच साम्य आहे. दोहोंच्या कालमानामध्यें फरक पडत नाहीं. मकरसंक्रांत नेहमी जानेवारीचे तेरा किंवा चौदा तारखेस पडते व मृग नक्षत्रास सूर्य जूनचे सहा किंवा सात तारखेस येतो. चंद्रग्रहणें व सूर्यग्रहणें हीं इंग्रेजी व हिंदी ह्या दोन्हीं पंचागांप्रमाणें नियमीत काळींच लागलेलीं दिसतात. इंग्रेजी तारीख व महिनें हे जरी निरनिराळे दिसले तरी वर्षाच्या दिवसांच्या कालमनामध्यें कांहीं फरक पडत नाहीं.

फार सावकाश गातात. त्याचप्रमाणें आपल्या गाण्याची दुप्पट, चौपट व आठपटही करतात. दुप्पट, चौपट, आठपट म्हणजे प्रथम म्हटल्यापेक्षां दुप्पट, चौपट, आठपट जलद म्हणणें होय.

ह्या मात्रांचे निरनिराळे ताल बसविले आहेत; ताल चार मात्रांपासून ३२ मात्रांपर्यंत आहेत. घड्याळ जसें वेळाचें माप दाखवितें त्याप्रमाणें मात्रांचें माप तबला, मृदंग वगैरे वाद्यें दाखवितात. गाणारा गाऊं लागल्या बरोबर ह्या वाद्यांची सुरवात करतात. गाणाराचे बरोबर वाद्यांचें माप सुरूं झालें म्हणजे गायनास फार शोभा येते. उत्तम गायन म्हणजे वाद्य व गायन ह्यांचा अगदीं एक जीव होणें होय. हा एक जीव होण्यास गायक व बजवय्या (वाद्य वाजविणारा) हे दोघेही आपआपले कामांत हुषार असावे लागतात.

गायनाला वाद्याच्या जोडीप्रमाणें नृत्याचीही जोड देतात. नृत्य ही कला बहुतेक स्त्रियांची आहे. ह्यामुळें पुरुष गवयास नृत्याची जरूर नाहीं. गायन, वादन व नृत्य ह्या तीन गोष्टी एके वेळीं झाल्यास त्यास संगीत असें ह्मणतात. हल्लीं नृत्याविरहित गाण्यासही संगीत म्हणतात.

वाद्याबरोबर गायन केल्यास तें फार गोड लागतें; ह्यामुळें गायन व वादन ह्या दोन्ही गोष्टींस गायन असें म्हणतात. वादन हा गायनाचा एक भागच होऊन बसला आहे. हल्लीं अनेक ताल प्रचारांत आहेत. तरी पहिला मुख्य ताल म्हटला म्हणजे " आदिताल " किंवा त्रिवट होय. ह्या तालाच्या सोळा मात्रा आहेत. कित्येक ह्याच्या ८ मात्रा आहेत असें समजतात. सोळा मात्रा धरल्या म्हणजे चार चार मात्रांचे चार भाग करतात. त्यांत पहिला भाग समेचा, दुसरा तालाचा, तिसरा कालाचा व चवथा तालाचा. आठ मात्रा धरल्यास दोन दोन मात्रांचे भाग करावे लागतात. एखाद्यानें चारच मात्रा धरून एक एक मात्रेचे भाग याप्रमाणें चार भाग केले तरी चालण्याजोगें आहे. वाजविणारानें मात्र तेवढ्या चार, आठ, किंवा सोळा मात्रांचे अवधींत त्रिवटाचे सर्व बोल घेतले म्हणजे झालें. ह्या सोळा मात्रांच्या एका खेपेमध्यें गायन संपत नाहीं. गायन संपण्यास अशा अनेक खेपा कराव्या लागतात. ह्या सोळा मात्रेच्या एका वेळेस आवर्तन असें म्हणतात. गातांना अशीं अनेक आवर्तनें करावीं

लागतात. गाणारा प्रथम पद्याचा भाग शब्दानीं म्हणतो, परंतु पुढें आलाप घेतेवेळीं आ–किंवा ई असा स्वर लांबवून त्यामध्यें स्वरांचे आरोह अवरोह करतो. अशा आ–किंवा ई ह्या स्वरांनीं जे स्वरांचे आरोह अवरोह होतात त्यांला तान किंवा आलाप असें म्हणतात. हे आलाप कानास फार गोड लागतात. हे आलाप सारखे घेण्यासाठीं गाणारास दम छाटावा लागतो. दम न छाटतां मध्येंच थांबून पुन्हा आलाप घेतल्यास ते कानास गोड लागत नाहींत, गवई लोक साधारणपणें अर्धा मिनिटापासून दोन मिनिटें पर्यंत दम छाटूं शकतात. तेवढा वेळ सारखा आलाप चाललेला असतो. आणि एवढ्या कालांत वाद्यावरचे तालाचीं दोन पासून आठ आवर्तनें होतात. एका सेकंदाहून जलद मात्रांचा ताल धरला असल्यास आठ पासून बत्तीस आवर्तनें पर्यंत आलाप चालतात.

आलाप पद्याच्या अक्षरापेक्षां चौपट किंवा आठपट जलद म्हणतात, व ह्यामध्यें फारच जलद आरोह अवरोह झाल्यामुळें ते फार मधुर लागतात. हे आलप गवई लोक बहुतेक पद्य संपविण्याचे वेळीं घेतात. कारण त्यामुळें शेवट फार खुलून दिसतो. आतां मुख्य मुख्य तालांची थोडी माहिती खालील कोष्टकांत दिली आहे:—

तालाचें नांव	मात्रा	मात्रांचे भाग
१ त्रिवट---तेताला किंवा आदिताल २ ख्याल ३ टप्पा ४ पंजाबी ठुंबरी	१६	४—४—४—४
५ दीपचंदी–होरी ६ धमारा ७ झुमरा ८ आडाचौताल	१४	३—४—३—४ ५—५—४—
९ धुमाळी १० सुलफाळ	८	४—४

११ दादरा १२ रूपक	६	३—३
१३ तेवडा १४ केरवा	७	३—४
१५ झंपा——	१०—	२—३—२—३
१६ चौताल धृपद—	१२—	४—४—२—२
१७ सवारी—	३२—	८—८—८—८

ह्यावरून आपले लक्षांत आलेंच असेल कीं, वाद्य हें गायकाचें गाण्याचें कालमापन यंत्र होय. ह्यावरून गायक कितीवेळ गातो हें कळत नाहीं, परंतु गाणाराचीं तालाचीं आवर्तनें किती होतात हें कळतें. एका पद्यामध्यें विशेषतः तानेमध्यें ज्या गवयाचीं तालाचीं ज्यास्त आवर्तनें होतील तो उत्तम गणला जातो. अर्थात ह्या आवर्तना बरोबर त्याचा आवाज व गाण्याची ढबही मनोहर पाहिजे.

योगलय व नादलय.

एखाद्या कार्यामध्यें मनुष्य गुंतलेला असून त्या कार्यामध्यें त्याचें मन पूर्ण गढून गेलें असल्यास त्याला त्या कार्या शिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. एकादा मनुष्य वाचनामध्यें गुंग होऊन गेला आहे व त्या मनुष्यास जेवणासाठीं त्याचे आईनें दहा हांका जरी मोठ्यानें मारल्या तरी त्याचें मन वाचनापासून न ढळल्यामुळें त्यास त्यापैकीं एकही हांक ऐकूं जात नाहीं. पुढें प्रत्यक्ष त्याला हालविल्यावर त्याची एकाग्रता मोडते व तो म्हणतो कीं मला कांहीं एक ऐकूं आलें नाहीं; कारण माझें मन वाचतानां अगदीं गुंग होऊन गेलें होतें. ही जी वाचनामध्यें त्याचे मनाची एकाग्रता झाली तिला लय असें म्हणतात. अशा तऱ्हेनें कामामध्यें लय लागल्यामुळें तोफेचा आवाजही कानास ऐकूं जात नाहीं! मग तें काम वाचनाचें, लिहिण्याचें, चित्रकलेचें किंवा कसलेंही असो.

मनाची एकाग्रता झाल्यामुळें मनास एकप्रकारचा आनंद होतो व हातीं घेतलेलें कार्य चांगलें होण्यास त्याची मदत होते. कारण मन एका गोष्टींत गुंतल्यामुळें ज्या गात्रांचें तें काम असेल तेवढ्या गात्रांसच काय ते श्रम होतात. ह्यामुळें बाकीच्या गात्रांस पूर्ण विश्रांति मिळते. मनाची एकाग्रता झाली म्हणजे बाहेर चाललेल्या गोष्टींपासून मनास त्रास होत नाहीं. नाहींतर आपलें मन चंचल झालेलें असल्यामुळें बाहेरच्या क्षुल्लक गोष्टींकडे तें जातें व त्यामुळें त्याची एकाग्रता होत नाहीं. असा समज होऊन त्या गोष्टींबद्दल आपलें मन व्यर्थ क्षुब्ध होतें. म्हणून मन ज्यावेळीं चंचल किंवा अस्थिर झालेलें असेल त्यावेळीं एकाग्रतेनें होणारें कार्य हातांत घेऊंनये हेंच बरें.

परमेश्वरस्वरूपाचा विचार करणें ह्यास योग असें म्हणतात. असे विचार करण्याचा जो अभ्यास करतात त्यास "योगाभ्यास" असें म्हणतात. असा विचार करतांना ज्यावेळीं मनाची एकाग्रता होते; तेव्हा त्यास योगलय असें म्हणतात. परमेश्वरस्वरूपाचा विचार करण्यासाठीं जेव्हां मनाची एकाग्रता करावयाची असेल त्यावेळीं शरीराचे सर्व व्यापार बंद करावे लागतात. नाहींतर डोळे उघडे ठेविल्यामुळें त्यांस दिसणाऱ्या पदार्थांसंबंधी विचार मनामध्यें येऊं लागतील. कान उघडे ठेविल्यास शब्दापासून मन चंचल होईल. तोंडानें बोलूं लागल्यास अगर कांहीं खाऊं लागल्यास तिकडे मन धांवतें. अशा तऱ्हेच्या मनास द्विधा करणाऱ्या ज्या गोष्टी त्यांस उपाधी असें म्हणतात. आपल्या सभोंवारच्या गोष्टींपासून मनाची एकाग्रता मोडल्यास त्यास बाह्योपाधी असें म्हणतात व आपले मनांत ईश्वराशिवाय इतर विषयांच्या कल्पना उद्भवल्यास त्यांस मनोपाधी असें म्हणतात. बाह्योपाधी पासून योगाभ्यासास त्रास पोंचू नये म्हणून एकांत स्थल पसंत करतात. मग तेथें "मनोपाधी" नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा लागतो. प्रथमतः योगाभ्यासास बसल्यास त्याचे मनांत इतर विषयांचें काहूर उभें राहतें. अशा वेळीं एका गोष्टीकडे लक्ष लागण्यासाठीं तो देवाची प्रतिमा आपले पुढें ठेवितो. त्या प्रतिमेकडे सारखें पाहत राहिल्यामुळें कांहीं काल मनामधील सर्व विचार मावळून दृष्टीस फक्त ती मूर्ती दिसूं लागते. ही जी मनाची

स्थिती त्यास " निर्विकार " मन असें म्हणतात. परंतु ही मनाची स्थिति फार वेळ कायम राहात नाहीं. तथापि पुढें अभ्यासानें तीच फार वेळ टिकते. असें झालें म्हणजे परमेश्वरप्रतिमेकडून दृष्टी काढून डोळे मिटतात व ती मूर्ती मनांत आणून मनाची एकाग्रता करतात. डोळे मिटूनही " मनोपाधी " चा त्रास होत नाहीं अशी जी स्थिती तीस समाधी असें म्हणतात. अशारीतीनें समाधी टिकूं लागली म्हणजे परमेश्वराचे प्रतिमेचें स्वरूप विसरून मनामध्यें कोणताच आकार न ठेवितां मन निर्विकार करतात. निर्विकार मनाचे समाधीपासून मनास फार आनंद व सुख प्राप्त होतें. त्या सुखाची कल्पना अनुभवाशिवाय होणें अशक्य आहे.

आपणांस गाढ निद्रा ज्या दिवशीं (रात्रीं) लागते त्यावेळीं आपणांस समाधीसुखाचा थोडासा अंश मिळतो. परंतु ह्या स्थितीमध्यें निद्रा लागल्या पासून जागृतावस्थे पर्यंत मनही निद्रिस्त असतें, त्याचे व्यापार बंद असतात; निद्रेमधें मनाचे व्यापार जेव्हां सुरू होतात तेव्हां स्वप्नस्थितीस प्रारंभ होतो. त्यावेळीं मनामध्यें जे जे विचार येतील ते ते विचार मूर्तस्वरूप धारण करतात. ह्यामुळें जागृतावस्थेमध्यें केलेल्या किंवा झालेल्या गोष्टींपासून जसे सुख दुखाचे विचार उत्पन्न होतात, तसे स्वप्नांतील मूर्त विचारांच्या गोष्टींपासूनही होतात. स्वप्न ही मनाची सृष्टी असल्यामुळें स्वप्नांतील गोष्टींपासून शरीरास कांहीं चलनवलन मिळत नाहीं.

समाधी ही एक प्रकारची निद्रा आहे पण ह्या निद्रेमध्यें मन जागृत असतें. त्याचे इतर व्यापार बंद होऊन एकाच विषयाकडे त्याचा लय लागतो व स्वप्नसृष्टिही निर्माण होत नाहीं. समाधीसुख सोडून सृष्टविषयांकडे मन लावण्याची इच्छा झाल्यास समाधी उतरतां येते. समाधीसुखाची कल्पना योगाभ्यासी लोकांशिवाय इतरांस होणें शक्य नाहीं. तरी पण त्या सुखाचा कांहीं अंश अभ्यासानें मिळूं शकेल. गाढ निद्रा व जागृतावस्था ह्यांचा जो संधिकाल तो समाधीचा अंश होय. कारण गाढ निद्रा येण्यापूर्वी मन निर्विकार झालें पाहिजे, तसें जर झालें नसेल तर स्वप्न-

सृष्टि सुरू होईल. गाढ निद्रा व जागृती ह्यांचा जो संधिकाल त्यास "तूर्या" असें ह्मणतात.

ज्याला समाधी साधते त्याला योगी असें म्हणतात. समाधीपासून त्याच्या मध्यें एक प्रकारची शक्ति उत्पन्न होते; त्याला समाधीमुळें सुख-दुःखाचे विचार तावडतोब नाहींसे करतां येतात. ह्यामुळें मानसीक दुःख मुळींच होत नाहीं. शरीरभोगापेक्षां मानसिक भोगांचा परिणाम शरीरावर फार होतो. त्यामुळें शरीर लवकर जीर्णावस्थेस येतें. योग्यांना सुखदुःख मुळींच शिवत नसल्यामुळें त्यांचें शरीर तेजःपुंज व सदृढ राहतें. ह्यामुळें त्यांची आयुष्यमर्यादा वाढते. ते नेहमीं आनंदांत असतात.

जगामध्यें खरी वस्तु एकच आहे (बाकीच्या सर्व नश्वर अथवा एकाच वस्तूवर अवलंबून आहेत) व तीच ध्यानांत आणून अन्य सृष्ट-विषयांस फांटा देऊन जे तिचे स्वरुपामध्यें गुंग झाले त्यांच्या आनंदास काय उणें आहे ? ही खरी वस्तू परमेश्वरावांचून दुसरी कोणती असणार ? त्या वस्तूच्या स्वरूपापासून अगर ध्यानापासून जो आनंद होतो त्याची तुलना नश्वर वस्तूंच्या आनंदाशीं करणें चुकीचें आहे; म्हणूनच योग्यांना फक्त "सच्चिदानंदी" असें म्हणतात व परमेश्वरास "सच्चिदानंद" असें म्हणतात. कारण सत्=खरें, चित्=वस्तुज्ञान आणि त्यापासून होणारा जो आनंद तो सच्चिदानंद होय. योगी ह्याच आनंदाचे पाठीमागें लाग-लेले असल्यामुळें सच्चिदानंदी होतात. असा आनंद ज्यास सदैव प्राप्त झालेला आहे त्याला जगांत आणखी काय संपादन करावयाचें राहिलें आहे ?

आत्मा हा ईश्वरी अंश असल्यामुळें परमेश्वराकडे त्याचा लय लवकर लागतो. अशी समाधी लागल्यावर त्याला देहाची किंमत वाटत नाहीं.

सती जाणाऱ्या स्त्रियांची समाधी पतीच्या रूपामध्यें लागल्यामुळें, त्या जिवावर उदार होऊन जीवंतपणीं देह जाळून घेतात. हा देह जळतांना समाधीमुळें त्यांनां देहाच्या वेदना कांहीं एक होत नाहींत. समाधीमध्येंच त्यांच्या देहाचा अंत होतो. आपलें मन एखाद्या गोष्टीकडे लागलें अस-तांना आपले शरिरास एखादी जखम झाल्यास आपली समाधी उतरेपर्यंत त्या जखमेचें आपणांस ज्ञानही होत नाहीं. सर्व संसारव्यापांपासून सोड-विणारा किंवा संसारव्यापामध्यें असूनही संसाराच्या सुखदुःखाच्या कल्पने-

पासून आपणास अलिप्त ठेवणारा योगासारखा दुसरा कोणी नाहीं आणि त्या योगसाधनाची पहिली पाहिरी मनाची एकाग्रता करण्याचा प्रयत्न करणें ही होय.

गायकापेक्षां योग्याची योग्यता मोठी आहे. कारण गायक फक्त मन आकर्षण करतो; पण योगी मनासही जिंकून टाकतो. वाद्यांतून अथवा गळ्यांतून मनोहर आवाज काढणें सोपें आहे; परंतु वाचेमधून मनोहर विचार प्रकट करणें अवघड आहे. वाद्यांतील तारेवर आघात करून उत्तम मेंढ किंवा आलाप घेतां येईल परंतु मनाच्या तारेवर आघात करणें अवघड आहे म्हणून योग सर्वांना साधण्या जोगा नाहीं. गायन स्वतःला आलें नाहीं व समजलें नाहीं तरीही तें श्रवण करून आनंद होईल. त्याप्रमाणें योगाचीं तत्वें न समजणारास आनंद होणार नाहीं. योगापेक्षां ईश्वरभक्ती हा जसा ईश्वरप्राप्तीचा अगदीं सोपा मार्ग आहे. त्याप्रमाणें गायन हेंही साधन फार सोपें आहे; आणि या दृष्टीनें पाहिलें असतां योगापेक्षां भक्ति व गायन हीं ईश्वरप्राप्तीचीं साधनें उत्तम आहेत असें म्हणतां येईल.

योगसाधनास जशी मनाची एकाग्रता पाहिजे व मनामध्यें एकच विचार पाहिजे त्याच प्रमाणें गायनामध्येंही मनाची एकाग्रता झाली पाहिजे. योगामध्यें ज्याप्रमाणें परमेश्वराचें स्वरूप ध्यानांत आणिलें पाहिजे त्याप्रमाणें गायनामध्यें नादस्वरूप सारखें मनांत घोळलें पाहिजे. ईश्वरासंबंधीं विचारामध्यें मनाची एकाग्रता झाली म्हणजे त्यास योगलय असें म्हणतात. योगाभ्यासामध्यें मनांत दुसरा विचार आल्याबरोबर समाधीचा जसा भंग होतो त्याच प्रमाणें गाणाराचे मनांत दुसरा विचार आला कीं, नाद विसरून जाऊन तो विरस होतो; म्हणजे त्याला नादाचें भान राहात नाहीं. समाधीमध्यें मनास ज्याप्रमाणें आनंद होतो त्याप्रमाणें गायनामध्येंही होतो. समाधीपासून समाधी लावणारास मात्र आनंद होतो परंतु गायनापासून गाणारास व श्रवण करणारास आनंद होतो. गायनामध्यें गाणाराची जशी समाधी लागते म्हणजे त्याचें मन नादांत गढून जातें, त्याप्रमाणें ऐकणाराचेंही जातें. म्हणूनच गायन हा सोपा योग आहे. स्वतःला जरी गायन आलें नाहीं तरी गायन श्रवण करून आपणांस

मनाची एकाग्रता करून घेतां येते म्हणून गायनाकडे सर्वांचा ओढा फार असतो. गायन ज्यास प्रिय नाहीं असा मनुष्य फारच विरळा.

ज्ञानमार्गापेक्षां व कर्ममार्गापेक्षां भक्तिमार्ग जसा अगदीं सोपा आहे त्याचप्रमाणें योगापेक्षां व गायनापेक्षां गायनश्रवण हा अत्यंत सुलभ मार्ग होय. तेव्हां योगाभ्यासाकडे ज्याचें लक्ष लागत नाहीं. त्यांनीं गायनाचें अध्ययन किंवा श्रवण करावें. त्यामध्यें मनाची एकाग्रता होऊं लागली म्हणजे वाटल्यास योगाकडे वळावें. योगलयाचा आनंद साधारण लोकांना मिळणें फार अवघड आहे. ह्यासाठीं त्यांनीं नादलयाकडे आपली प्रवृत्ति करून घ्यावी हें चांगलें. त्याप्रमाणें बरेच लोकांची प्रवृत्ति गायनश्रवणाकडे आहे ही आनंदाची गोष्ट होय.

गायन, भजन, योग, ह्यांकडे ज्यांचें मन लागत नाहीं; ते गांजा, तंबाखू अफू. कुचला, मद्य वगैरे पदार्थांचें सेवन करून आपल्या मेंदूस क्षीण करून टाकतात. त्यामुळें विचारशक्तीचा जोर कमी होऊन त्यांचें मन एखाद्या गोष्टीकडे लागतें किंवा अनेक गोष्टींचे विचार एका पाठीमागून एक असे येऊं लागल्यामुळें तो कावराबावरा होऊन कांहींतरी बहकत सुटतो. ह्या पदार्थांचें सेवन जास्त झाल्यास विचारशक्ती अगदीं नाहींशी होऊन मनुष्य बेशुद्ध होऊन पडतो. त्या स्थितीस "व्यसन-समाधी" असें म्हणतात. ह्या समाधीसुखाची गोडी लागून वाटेल त्या स्थितींत बेशुद्ध होऊन पडणें ही एक उत्तम गोष्ट असें समजून ह्याचा उपभोग अक्षय घेणारेही आहेत. तेव्हां या व्यसनसमाधींतही आनंद भरला नाहीं असें म्हणण्याची कोणाची प्राज्ञा आहे?

ब्रह्मानंद व गानानंद.

मोतीं व पोंवळें ह्या दोन्ही पदार्थांमध्यें चुना असतो. त्याचप्रमाणें संगमरवरी दगडामध्येंही चुना असतो. तेव्हां तात्विकदृष्टीनें पाहिलें म्हणजे मोतीं, पोंवळें, चुना, खडू वगैरे पदार्थांमध्यें फरक नाहीं. हिरा व कोळसा ह्या दोन्हीं पदार्थांमध्यें "कारबान" नांवाचें एकच तत्व

आहे तेव्हां त्या दोहोंमध्यें कांहीं फरक नाहीं. ह्या सर्वांमध्यें एकच तत्व भरलें आहे. त्याच प्रमाणें सत्व, रज व तम ह्या तिन्हीमध्यें गुणच भरला आहे. बरे व वाईट हे जरी गुण भेददर्शक निरनिराळे शब्द आहेत तरी, ते गुणच आहेत. काम क्रोधादि सहा हे विकारच होत. त्यांमध्यें फरक नाहीं. त्याचप्रमाणें ज्ञानी, अज्ञानी, संसारी, योगी हे सर्व मनुष्यप्राणीच आहेत, तेव्हां त्यांच्यांत फरक मानणें चुकीचें आहे. मांसाहारी श्वापदांची तृप्ति योगी, संन्यासी, संसारी वगैरे सर्व मनुष्यांचे मांसापासून सारखीच होणार. हें सर्व जग सजातीय गुणांनीं भरलें आहे.

हें सर्व जग ब्रम्हानें भरून गेलें आहे म्हणून सर्व ठिकाणीं ब्रम्हानंद दिसतो. अमुक एक वस्तूंत आनंद नाहीं असें नाहीं. प्रत्येकांत एक प्रकारचा आनंद आहे. तिखट, आंबट, खारट, तुरट वगैरे रसांची चव जरी निराळी आहे तरी त्यांत गोडीच आहे. फक्त ही गोडी आवडी-नीवडीवर अवलंबून आहे. ज्याला गोड पदार्थ म्हणजे साखरेचे पदार्थ आवडतात त्यांस तो गोड म्हणतो. ज्याला तिखट किंवा खारट पदार्थ आवडतात तो त्या पदार्थांनां गोड असें म्हणतो. सर्व रसांत गोड रस जरी खरा गोड आहे तरी इतर रसांच्या चवीसही आम्हीं गोडच म्हणतों. लिंबू गोड, हिरवा आंबा गोड, चिंच गोड, मिरची गोड, कांदा गोड, बटाटा गोड, ऊंस गोड, साखर गोड, सुपारी गोड, मीठ गोड, सर्वच गोड. आतां एकाला एक गोड वाटेल व दुसऱ्यास दुसरें गोड वाटेल; हें निराळें.

जिभेला ज्याप्रमाणें सर्व तऱ्हेचे खाद्य पदार्थ गोडच वाटतात त्याचमाणें डोळ्यांसही सर्व पदार्थ गोडच दिसतात. मग एकाला जनावरें बरीं वाटोत, एकाला पक्षी बरे वाटोत, किंवा एखा-द्याला सर्वच बरें वाटो. त्याचप्रमाणें एखाद्याला पांढरा रंग आवडतो, एखाद्याला लाल रंग आवडतो; मिळून अमूक एक तऱ्हेचा रंग कोणास आवडत नाहीं असें नाहीं, जीभ व दृष्टीप्रमाणें कानासही सर्व शब्द — आवाज — नाद, प्रिय आहेत. घ्राणेंद्रियही वासास मधुर अशी संज्ञा देतें. त्याचप्रमाणें स्पर्शेंद्रियासही सर्व वस्तूंचा स्पर्श बरा वाटतो. कित्येक लहान मुलांना आलिंगन देऊन सुख मानतात, कित्येक कुत्रा, मांजर,

रेडकूं. वासरूं, पोपट वगैरे जनावरांना व पक्षांनासुद्धां मिठ्या मारून त्यावर पोटच्या पोरांप्रमाणें किंबहुना त्यांहून जास्त प्रेम करतात. ह्यावरून हें उघड दिसतें कीं, सर्व वस्तूंत आनंद भरला आहे. अमूक एक गोष्ट चांगली व अमुक एक गोष्ट वाईट असें म्हणण्याची कोणास छाती होणार नाहीं.

आपल्याला आवडत नसेल त्या गोष्टींचा स्वीकार आपण करूं नये; पण दुसऱ्यास आपली आवड सांगूं लागणें चांगलें नाहीं, कारण आपल्यास ती गोष्ट आवडली नाहीं, तरी त्या गोष्टीचा भोक्ता परमेश्वरानें निर्माण केलेला आहे. तेव्हां त्याच्या आड आपण येणें हें रास्त नाहीं. प्रत्येक मनुष्याला परमेश्वरानें निराळा देह दिला आहे त्या अर्थी तो स्वतंत्रच आहे व त्याचे ठिकाणीं उत्पन्न होणारी आवडही स्वतंत्रच असणार. हें आवडीचें स्वातंत्र्य आपण त्याला कां न द्यावें? आपणांस एखादी गोष्ट अप्रिय झाली म्हणून त्याबद्दल दुसऱ्यास दूषण कां द्यावें? असें दूषण देऊन त्याच्या आनंदाचा विरस कां करावा?

शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध ह्या सर्वांमध्यें आनंद भरला आहे त्या आनंदाचा उपभोग मनुष्यांनीं व इतर प्राण्यांनीं आपले इच्छेप्रमाणें खुशाल घ्यावा. सृष्टपदार्थांचे मुख्यतः तीन भाग करतात. त्यास जड किंवा घन, पातळ व वायुरूप असें म्हणतात; परंतु जड पदार्थाला उष्णता दिली म्हणजे तोच पातळ होतो. त्या पातळ पदार्थास आणखी उष्णता दिली म्हणजे तोच पदार्थ वायुरूप होतो व शेवटीं हवेमध्यें मिळून जातो. हवा ही वायुरूप आहे, ती दोन तऱ्हेच्या वायूंची बनलेली आहे. ह्या हवेस बर्फाहून पुष्कळ कमी उष्णता दिल्यास ती द्रवरूप होते. त्याहूनही कमी उष्णता दिल्यास ती घन होते. ह्यावरून लक्षांत आलें असेलच कीं, आपणांस जड दिसणारी धातू ही वायुरूप होते. वायुरूप असणारी हवाही दोखंडासारखी जड होते. ती त्यांची स्थिती उष्णतेवर अवलंबून आहे. जड, पातळ व वायु हे तिन्ही भेद कायमचे नाहींत म्हणजे खरे नाहींत त्याच प्रमाणें सत्व, रज व तम हे जरी निरनिराळे गुण भासले तरी त्यांना शेवटील गति एकच मिळणार म्हणजे सर्वांचा परिणाम एकच होणार. हेंच तत्व मनांत आणून किंवा मनांत न आणतां प्राणी आपापल्या स्वभावानु-

रूप वर्तन करून आनंद मानीत असतो. आनंद हा सृष्टपदार्थांच्या परमाणु-प्रमाणें अखंड आहे.

साखरेच्या अत्यंत सूक्ष्म कणामध्यें ज्या प्रमाणें गोडीच भरलेली असते त्या प्रमाणें कोणत्याही कृत्यापासून झालेल्या आनंदामध्यें सारखीच गोडी आहे. आत्मा हा परमेश्वराचा अंश म्हणजे अत्यंत सूक्ष्म असा परिमाणू आहे व ह्यामध्यें परमेश्वराची गोडी भरलेली आहे म्हणूनच योगी आत्मस्वरूपामध्यें निमग्न राहून परमेश्वराचे गोडीचा अनुभव घेत असतात. ह्या गोडीसच अमृत असें नांव आहे. परंतु विषयी जन ह्या अमृताची गोडी घेण्याची इच्छा सोडून सृष्टपदार्थांच्या गोडीमध्यें निमग्न राहातात, कारण शब्दरसादि पदार्थांमध्येंही आनंद भरला आहे. त्रिगुण–सत्व, रज, तम–ह्या मध्येंही आनंद भरला आहे. मनुष्य आपल्या स्वभावाप्रमाणें त्या गुणांपासून होणाऱ्या आनंदाचा उपभोग घेतो. परोपकार करण्यापासून अथवा सृष्टपदार्थांचे उपभोगापासून किंवा दुसऱ्यास ताप दिल्यापासूनही मनुष्य आनंद मानतो. हीं तिन्हीं कृत्यें जरी परस्परांपासून भिन्न आहेत तरी निरनिराळ्या प्रकृतिस्वभावामुळें हीं सर्वच कृत्यें आनंददायक आहेत.

मनुष्यास परमेश्वरानें बुद्धी ही अजब देणगी दिली आहे. ह्या देणगीच्या योगानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती हें त्याला चांगलें समजतें. ह्यांपैकीं चांगल्या वाटणाऱ्या गोष्टींस पुण्य व वाईट वाटणाऱ्या गोष्टींस पाप असें म्हणतात. पुण्यकारक गोष्टींपासून मनास समाधीसुखासारखा आनंद होतो. पापकारक गोष्टीं पासून त्याची बुद्धी त्याला सारखी टोंचित असते. ह्यामुळें त्याच्या जीवास चैन पडत नाहीं. त्यापासून त्याचे मनास दुःख होतें. मानसिक दुःखाच्या शिक्षेशिवाय शारीरिक रोगाची शिक्षाही पापाबद्दल मिळते. मानसिक रोग, शारीरिक रोग, संसारांतील संकटें, अशक्तता, शारीरव्यंग वगैरे अनेक शिक्षा परमेश्वरानें निर्माण केल्या आहेत; ह्या शिक्षा म्हणजे " नरक " होय. त्या शिक्षा पापपुण्याच्या हिशोबाप्रमाणें लवकर अथवा उशीरानें अमलांत येतात. परमेश्वर सर्वसाक्षी असल्यामुळें कितीही गुप्तपातक केलें तरी त्याला तें ताबडतोब कळतें. इतकेंच नव्हे पण पातकाची क्रिया चालू असतांना देखील तो

पाहत असतो. तरी मनुष्य आपले स्वभावाप्रमाणें वाईट कृत्येंही बेधडक करतो. हें कृत्य करतांना त्याला त्याची बुद्धि जरी बरें आणि वाईट ह्याची चांगली फोड करून त्याचे मनास सांगत असते तरी, स्वभावमदामुळें तिकडे तो दुर्लक्ष करतो. परंतु प्रथम आनंददायक अशी वाटणारी वाईट गोष्ट त्याला दुःखांत लोटून देते. त्यावेळीं त्याला पश्चात्ताप होतो. परंतु पुन्हा त्याला स्वभावाची निशा येते. त्यामुळें एकदां आलेला अनुभव विसरून तो वाईट कृत्यें करण्यास प्रवृत्त होतो. परंतु त्याच्या प्रवृत्तीचा हेतू आनंदशोधन हाच असल्यामुळें त्याला वाईट म्हणतां येत नाहीं.

योगलय, मानलय व व्यसनलय हीं जरी निरनिराळीं आहेत व ह्यांची योग्यताही समजूतदार मनुष्य निरनिराळी समजतो तरी सर्वांचा परिणाम " लय " च आहे. तेव्हां त्यास बरें वाईट तरी कां ह्मणावें ? ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, ज्याला जें आवडेल तें उत्तम.

सिद्धपुरुषांना योग उत्तम वाटतो; नादी लोकांना गायन, भजन, प्रिय वाटतें. व्यसनी मनुष्य व्यसनास अमृताप्रमाणें गोड मानतो. सत्वगुणी परोपकारामध्यें तल्लीन होतो. रजोगुणी विषयांसच मोक्ष समजतो. तमोगुणी दुष्ट कृत्यांमध्यें आनंद मानतो. तेव्हां जगांतील सर्व गोष्टी आनंदजनक आहेत असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

जगांतील सर्व वस्तु ज्याप्रमाणें आनंदानें भरल्या आहेत त्या प्रमाणें सर्व नादही आनंदमय आहे. जो तो आपल्या नादामध्यें गुंग असतो. कोकिलेचा आवाज फार गोड आहे म्हणून ती शब्द करिते असें नाहीं, ती आपल्या आवाजामध्यें आनंद मानते म्हणून शब्द करते. कावळाही आपला कर्कश आवाज काढून, त्यापासून सुख उत्पन्न करून घेतो. कोकिलेचा आवाज मंजुळ व कावळ्याचा कर्कश असें तिऱ्हाईत म्हणतो. परंतु त्याचा त्याला आवाज उत्तमच वाटतो. म्हणून गाण्याची माहिती कमी अगर जास्त असली तरी आणि कसाही आवाज असला तरी मनुष्य आपल्याशीं गुणगुणण्यांतच आनंद मानतो. त्यामध्यें त्याचें वैगुण्य काढल्यास त्याला फार वाईट वाटतें. तेव्हां सुज्ञ मनुष्यांनीं त्यांना दूषण देवूं नये. कारण गायकांनींच फक्त आपल्या आवाजापासून सुख उत्पन्न करून घ्यावें व इतरांनीं गप्प बसावें हा न्याय नव्हे. शिवाय जगांत सर्व

गायकच निर्माण व्हावेत अशी महत्वाकांक्षा बाळगणें व्यर्थ आहे. शिवाय योगी लोक भक्तांना ते ईश्वरभक्त आहेत असें समजून ज्या प्रमाणें दूषण देत नाहींत तर त्यांना आपले बरोबरीचेच मानतात त्याच प्रमाणें कसाही गाणारा असला तरी तो " नादभक्त " आहे असें समजून गायकांनीं त्याला आपले बरोबरीचा मानावें.

गायन, नाटक, तमाशा, गोंधळ, नृत्य, ललीत, भजन, कीर्तन व पूजन वगैरे सर्व ठिकाणचे नाद आवडीप्रमाणें लोकांना गोड वाटतात. व त्या सर्व ठिकाणीं लोकांची गर्दी असते. ह्यापैकीं अमुक गोष्ट चांगली अगर अमुक गोष्ट वाईट हें तिऱ्हाइतानें वाटेल तर म्हणावें परंतु ज्याला ज्या नादाची गोडी असते तिकडे तो गेल्याशिवाय रहावयाचा नाहीं; मग त्याला ती गोष्ट वाईट किंवा चांगली हें कळलें असलें तरी त्याची आवड त्याला तिकडे ओढून नेते.

एकंदरींत एवढी गोष्ट खरी कीं, ब्रम्ह जसें आनंददायक आहे तसा नादही आनंदमय आहे. म्हणून सर्व जग आनंदानेंच भरून गेलें आहे. आणि ज्या अर्थीं आपण अशा आनंदी जगांत उत्पन्न झालों आहोंत त्या अर्थीं आपण आनंददायक अशींच कृत्यें करावीं. जगाच्या आनंदांत आपण भर घालावी हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. सर्व गोष्टींत ज्याअर्थीं आनंद आहे, त्याअर्थीं सुख आणि दुःख हे दोन्ही शब्द विसरून जावून त्या ठिकाणीं " आनंद " हा एकच शब्द योजावा.

सुखदुःख विसरून जाऊन प्राप्त झालेल्या प्रत्येक स्थितीस जो मनापासून आनंदाची संज्ञा देईल त्यास योगसाधनाशिवाय व गायना वांचूनही ब्रम्हानंद प्राप्त होईल. व त्यामुळें त्याला आनंदा शिवाय कांहींच दिसणार नाहीं. अशी आनंदमय चित्तवृत्ती ज्याची बनेल त्यास परमेश्वरस्वरूपाचें ज्ञान सहज होईल.

समाप्त.

